नागपूर मुख्य कार्यालय
कॉटन मार्केट, नागपूर - ४४००१८

संपर्क
संपादकीय : ९९२२९७००२३
वितरण : ८८८८६४७७५३
जाहिरात : ७४४७७३५८५१ / ९३२६९०६०६२
नागपूर कार्यालय संपर्क : ७४४७७३५८५१

नागपुर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com

* वर्ष ५१ * अंक २२२ * * अमरावती * शनिवार, दिनांक १४ फेब्रुवारी २०२६ ८ पाने ● किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.) * विशेष ऑफर : महासागर + नागपूर पोस्ट = ४ रु. फक्त

## बांगलादेशात २० वर्षांनी बीएनपीचा विजय

■ वृत्तसंस्था, ढाका, दि. १३ :
बांगलादेशमध्ये झालेल्या सार्वत्रिक निवडणुकीत बांगलादेश नॅशनलिस्ट पार्टी (बीएनपी) ने मोठा विजय मिळवला आहे.
बीएनपीने 299 जागांपैकी 209 जागा जिंकून बहुमतासाठी आवश्यक असलेला 150 चा आकडा पार केला. जमात-ए-इस्लामीच्या नेतृत्वाखालील 11 पक्षांच्या आघाडीला आतापर्यंत 70 जागा मिळाल्या आहेत. देशात सुमारे 20 वर्षांनंतर बीएनपीचे सरकार स्थापन झाले आहे. 2008 ते 2024 पर्यंत तिथे शेख हसीना यांची आवामी लीग सत्तेत होती. या विजयामुळे माजी पंतप्रधान खालिदा झिया यांचे पुत्र आणि बीएनपी अध्यक्ष तारिक रहमान पंतप्रधान बनणे निश्चित मानले जात आहे.

# नवी विटी, नवा दांडू




आज बांगलादेशच्या निवडणुकीचे निकाल लागले, तिकडे मतदान संपले आणि इकडे मतमोजणी सुरू झाली. असाच प्रकार इंग्लंडमध्येही होतो मतदान झाल्यावर महिना महिनाभर वाट पाहायला लावणारी आपली भारतातील मतमोजणीची व्यवस्था अनेक प्रश्न निर्माण करते. बांगला देशच्या निवडणूक निकालाचे विश्लेषण करताना अनेक बाबी स्पष्ट होत आहेत. पहिली गोष्ट म्हणजे बेगम खलिदा झिया आणि बेगम शेख हसीना यांच्यापैकी एका कुटुंबाच्या हातात सत्तेची घेवाण-देवाण होत असते. यावेळी परिस्थिती जरा वेगळी आहे. बांगला देशातील तरुणाई म्हणजेच जेन-झी ने बेगम शेख हसीना यांच्या विरुद्ध जबरदस्त आंदोलन उभे केल्यामुळे शेख हसीना यांना आपला देश सोडून भारतात आश्रय घ्यावा लागला. त्यानंतर बांगला देशची सत्ता तेथील बँकर मोहम्मद युनूस याच्याकडे आली. तसे पाहिले तर बांगला देशाच्या निवडणुका अजून लवकर व्हायला पाहिजे होत्या, पण या ना त्या कारणामुळे तेथील सत्ताधीशाने बरेच महिने सत्ता उपभोगलेली आहे. त्या सत्ताधीशाने म्हणजेच मोहम्मद युनूसने भारताविरुद्ध जणू काही युद्ध पुकारले होते. बांगला देशातील जिहादी, पाकिस्तानवादी आणि भारताच्या छुप्या शत्रूंनी एक आघाडीच उघडली होती. गेल्या राष्ट्रीय निवडणुकीमध्ये बेगम हसीना यांनी गडबड करून सत्ता मिळवल्याचा आरोप त्यांच्यावर करण्यात आला. तेव्हा बेगम खलिदा झिया आजारी होत्या. आज ज्या परिस्थितीमध्ये बेगम हसीना आहेत तशाच अवस्थेत त्या होत्या. आता खलिदा पुत्राच्या पक्षाला बहुमत मिळालेले आहे. कट्टरतावादी पक्षाने थोड्याफार जागा जिंकलेल्या आहेत पण सत्ता बेगम खलिदा झिया यांच्या पुत्राच्या हाती राहील असे निकालावरून स्पष्ट दिसते. या पक्षाला भारताशी वैर घेणे परवडणारे नाही, हे त्या पक्षाला समजल्याचे वृत्त आहे त्यामुळे शेख हसीना इतके नसले तरी भारताबरोबर थोडेफार सलोख्याचे संबंध ठेवण्याचा त्यांचा इरादा नक्कीच असेल. बांगला देशाच्या निर्मितीसाठी भारताने जी मदत केलेली आहे ती त्या देशातील कुणालाही विसरता येणार नाही. पण त्यानंतर आता तिसऱ्या पिढीच्या हाती सत्ता आलेली आहे ती पिढी भावनिक दृष्ट्या विचार करत नाही तर ती व्यावहारिक दृष्ट्या विचार करते.

▶▶ पान ८ वर

## मंत्रालयात ६ वर्षे एकाच खुर्चीवर अधिकाऱ्यांचे ठाण

# आता दोन महिन्यांत बदल्या

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १३ :
मंत्रालयातील प्रशासकीय कामकाजात पारदर्शकता आणि गतिमानता आणण्यासाठी राज्य सरकारने आता कंबर कसली आहे.

मंत्रालयातील विविध विभागांत गेल्या सहा वर्षांपासून एकाच पदावर ठाण मांडून बसलेल्या सह-सचिवांपासून ते लिपिकांपर्यंतच्या सर्वच अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या आता एप्रिल-मे महिन्यात घाऊक बदल्या होणार आहेत. या बदल्या थांबवण्यासाठी कोणत्याही

### बदली टाळण्यासाठीची फील्डिंग फेल ठरणार



प्रकारची राजकीय फील्डिंग किंवा दबावतंत्र चालणार नाही, असे संकेत शासनाने दिले आहेत.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वारंवार लक्षात आले होते, त्यामुळे मुख्यमंत्र्यांनी दिलेल्या आदेशानुसारच आता बदल्यांची प्रक्रिया राबवली जाणार आहे. यामुळे ज्यांना बदली करून घ्यायची आहे, त्यांचे मात्र चांगलेच धाबे दणाणले असल्याचे सांगण्यात येत आहे. दुसरीकडे काह जणांनी याबाबत आनंदही व्यक्त केला आहे.

अपर मुख्य सचिव (सेवा) व्ही. राधा यांनी मंत्रालयातील सर्व विभागांना यासंदर्भात तातडीने तयारी करण्याचे निर्देश दिले आहेत. ज्या अधिकारी-कर्मचाऱ्यांचा एकाच पदावरील कार्यकाळ सहा वर्षे पूर्ण झाला आहे, त्यांची यादी त्वरित तयार करण्यास सांगण्यात आले आहे. बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५ नुसार ही कठोर कारवाई होईल.

कोणत्याही शासकीय अधिकारी किंवा कर्मचाऱ्याची एकाच पदावरील सामान्य सेवाकाळाची मर्यादा ३ वर्षे असते. अपवादात्मक

▶▶ पान ८ वर

## बजेटपूर्वी मुख्यमंत्र्यांकडून विभागांची झाडाझडती

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १३ :
येत्या २३ फेब्रुवारीपासून सुरू होणाऱ्या अर्थसंकल्पीय



अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गुरुवारी वर्षा बंगल्यावर मॅरेथॉन बैठकीत मराठवाडा, पुणे व कोकण विभागातील प्रलंबित कामांचा आढावा घेतला. प्रत्येक कामाची माहिती घेत प्रशासकीय यंत्रणेला कडक ताकीद दिली.

मराठवाड्यातील दुष्काळ कायमस्वरूपी मिटवण्यासाठी आखलेल्या मराठवाडा वॉटर ग्रीड योजनेच्या अंमलबजावणीत दिरंगाई खपवून घेणार नाही, असे त्यांनी वरिष्ठ अधिकाऱ्यांना बजावले. येत्या अर्थसंकल्पात मराठवाड्यासाठी मोठ्या तरतुदीचे संकेत देत त्यांनी राजकीय आणि प्रशासकीय पातळीवर मोर्चेबांधणी सुरू केल्याचे या बैठकांतून दिसले. छत्रपती संभाजीनगर विभागातील ८ जिल्ह्यांच्या वार्षिक योजनांचा आढावा घेताना मुख्यमंत्र्यांनी आठही जिल्ह्यांच्या

▶▶ पान ८ वर

### बेंगळुरूजवळ भीषण अपघात

## सात जणांचा मृत्यू

■ वृत्तसंस्था, बेंगळुरू, दि. १३ :
बेंगळुरूच्या बाहेरील होस्कोट परिसरात आज सकाळी झालेल्या भीषण रस्ता अपघातात सात जणांना जीव गमवावा लागला. होस्कोट-दबासपेटे राष्ट्रीय महामार्गावरील एम. सत्यावरा गावाजवळ कार, दुचाकी आणि कॅन्टर वाहन यांच्यात सलग धडकांची मालिका घडली आणि काही क्षणांतच भीषण दुर्घटना घडली.

प्राथमिक माहितीनुसार, होस्कोटहून देवनहल्लीच्या दिशेने जाणाऱ्या कारने मागून एका दुचाकीला जोरदार धडक दिली. या धडकेनंतर कारवरील चालकाचे नियंत्रण सुटले आणि वाहन समोरून येणाऱ्या कॅन्टरला जाऊन आदळले. त्यानंतर आणखी एका कारलाही धडक बसली. यात सात जण ठार झालेत.

## पंतप्रधान कार्यालयाच्या नवीन इमारतीचे उद्घाटन

■ वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. १३ :
पंतप्रधान कार्यालयाचा पत्ता आजपासून बदलला आहे. शुक्रवारी नरेंद्र मोदी यांनी नवीन पंतप्रधान कार्यालय सेवा तीर्थ आणि कर्तव्य भवन १ आणि २ चे उद्घाटन केले. आतापर्यंत पंतप्रधान कार्यालय साउथ ब्लॉकमध्ये होते.

पंतप्रधान मोदी म्हणाले की, नॉर्थ ब्लॉक आणि साउथ ब्लॉक इमारती ब्रिटिश राजवटीचे प्रतीक होत्या. गुलामगिरीच्या भारताच्या भूमीवर ब्रिटिश महाराजांचे स्वप्न साकार करण्यासाठी या इमारती एक माध्यम म्हणून काम करत होत्या. आपल्याला गुलामगिरीच्या या मानसिकतेतून मुक्त होणे आवश्यक आहे.

पंतप्रधान म्हणाले, "दिल्लीच्या इमारती आणि ऐतिहासिक स्थळे गुलामगिरीच्या खुणांनी भरलेली आहेत. स्वतंत्र भारतात शहीद झालेल्या सैनिकांचे स्मारक नव्हते. २०१४ मध्ये, देशाने निर्णय घेतला की गुलामगिरीची मानसिकता आता सहन केली जाणार नाही. या निर्णयांमागे आमची सेवाभावी भावना आहे."

**'सेवा तीर्थ' संकुलाचे उद्घाटन**

शुक्रवारी सकाळी पंतप्रधानांनी

▶▶ पान ८ वर

## मंत्री झिरवळ यांचा कारकून लाच घेताना जेरबंद

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १३ :
अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवळ यांचे निकटवर्तीय कारकून राजेंद्र ढेरंगे यांना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने मंत्रालयातच रंगेहाथ अटक केली. अन्न व औषध प्रशासन विभागात वैद्यकीय परवाना देण्यासाठी ५० हजार रुपयांच्या लाचेची मागणी करण्यात आली होती. तडजोडीअंती ३५ हजार रुपये ठरले.

तक्रारीवरून एसीबीच्या पथकाने मंत्रालयाच्या दुसऱ्या मजल्यावर सापळा रचला आणि सायंकाळी राजेंद्र ढेरंगे याला पैसे स्वीकारताना ताब्यात घेतले. अटकेनंतर ढेरंगे याने दिलेल्या जबानीत धक्कादायक खुलासा केला असून, मंत्र्यांचे खासगी सचिव (पीएस) रामदास गाडे यांच्या सांगण्यावरूनच आपण ही रक्कम स्वीकारत होतो, असा दावा त्याने केला.

या कारवाईवेळी रामदास गाडे हे मंत्री झिरवळ यांच्यासोबत दिल्ली दौऱ्यावर होते. त्यांनी या प्रकरणाशी आपला कोणताही संबंध नसल्याचा दावा केला असला, तरी मंत्रालयातील भ्रष्टाचार उघड झाल्याने सरकारची प्रतिमा मलीन झाली आहे.


दरम्यान, 'महाभ्रष्ट' महायुती सरकारच्या काळात मंत्रालयात खुलेआम कमिशनखोरी सुरू असल्याचा आरोप करत काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी झिरवळांच्या राजीनाम्याची मागणी केली आहे.


### ...तर तात्काळ राजीनामा



नरहरी झिरवाळ यांनी आपली भूमिका स्पष्ट करत प्रतिक्रिया दिली. या प्रकरणाशी आपला कोणताही संबंध सिद्ध झाल्यास नैतिकतेच्या मुद्द्यावर तात्काळ राजीनामा देण्याची तयारी त्यांनी दर्शवली. जर माझी कोणतीही लिंक आढळली, तर पदावर राहण्याचा प्रश्नच नाही, असे स्पष्ट शब्दांत त्यांनी सांगितले.

झिरवाळ यांनी कायद्यापुढे सर्व समान असल्याचे नमूद केले. संबंधित कर्मचाऱ्यावर कायद्यानुसार कठोर कारवाई होईलच, शिवाय विभागीय पातळीवरही स्वतंत्र चौकशी करून दोषींना शिक्षा दिली जाईल, असे त्यांनी स्पष्ट केले.

# लाचखोरीमुळे सरकारच्या अब्रूची लक्तरे वेशीवर



■ **मुंबई :** राज्याचे अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ यांच्या कार्यालयातील लाचखोरीच्या घटनेमुळे राज्य सरकारच्या अब्रूची लक्तरे वेशीवर टांगल्या गेल्याची टीका काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केली आहे. या घटनेच्या निष्पक्ष चौकशीसाठी त्यांनी मंत्री नरहरी झिरवाळ यांच्या तत्काळ राजीनाम्याची मागणी केली आहे. मंत्री नरहरी झिरवाळ यांच्या अन्न व औषध प्रशासन विभागाच्या कारकून राजेंद्र ढेरंगे यांना 50 हजार रुपयांची लाच घेतल्याप्रकरणी लाचलुचपत प्रतिबंधक खात्याने अटक केली आहे. चक्क मंत्रालयात लाचखोरीची ही घटना घडल्यामुळे राज्याच्या राजकीय वतुर्ळात एकच खळबळ माजली आहे. मंत्री झिरवाळ यांनी या प्रकरणाशी आपला संबंध आढळला तर आपण तत्काळ राजीनामा देऊ अशी भूमिका स्पष्ट केली आहे. पण राजेंद्र ढेरंगे यांनी झिरवाळ यांचे स्विय सहाय्यक रामदास गाडे यांच्या सूचनेनुसारच ही लाच घेतल्याचा दावा केला आहे. यामुळे झिरवाळ यांच्या अडचणींत वाढ झाली आहे. या पार्श्वभूमीवर काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी त्यांच्या राजीनाम्याची मागणी केली आहे. हर्षवर्धन सपकाळ म्हणाले, राज्याचे अन्न व औषध प्रशासन मंत्री, नरहरी झिरवळ यांच्या कार्यालयातील कर्मचाऱ्याला मंत्रालयात लाच घेताना रंगेहाथ पकडण्यात आले. त्यामुळे लाचलुचपत विभागाने मंत्री कार्यालय सिल केले आहे.

# तंत्रज्ञान, उत्पादन आणि सेवांमध्ये वाकायामा प्रीफेक्करसोबत सहकार्य मजबूत

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १३ :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, महाराष्ट्र आणि जपानच्या वाकायामा प्रांताचे दीर्घकालीन मैत्रीपूर्ण संबंध आहेत आणि भविष्यात तंत्रज्ञान, उत्पादन आणि सेवा उद्योग क्षेत्रात सहकार्य आणखी वाढेल. जपानसोबत आर्थिक आणि सांस्कृतिक संबंध अधिक दृढ करण्याची इच्छाही त्यांनी व्यक्त केली.

वाकायामा प्रांताचे गव्हर्नर मियाझाकी इझुमी यांनी जपानी शिष्टमंडळासह मुंबईतील ताजमहाल हॉटेलमध्ये मुख्यमंत्र्यांची भेट घेतली. याप्रसंगी महाराष्ट्र विधानसभेचे अध्यक्ष राहुल नार्वेकर, जपानचे मुंबईतील कॉन्सुल जनरल योगी कोजी, वाकायामा विधानसभेचे उपाध्यक्ष अकिझुकी फुमिनारी आणि जपानी सरकार , विधिमंडळ, सांस्कृतिक, क्रीडा आणि औद्योगिक क्षेत्रातील प्रतिनिधी उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, मुंबई ही भारताची आर्थिक, व्यावसायिक, सांस्कृतिक आणि मनोरंजन राजधानी आहे. " भगिनी राज्ये " म्हणून , महाराष्ट्र आणि वाकायामा यांचे अनेक वर्षांपासून मैत्रीपूर्ण संबंध आहेत. २०१३ मध्ये दोघांमध्ये सहकार्यासाठी सामंजस्य करार (एमओयू) झाला होता, जो २०२३ पर्यंत



नूतनीकरण करण्यात आला. या काळात संस्कृती, क्रीडा, पर्यटन आणि शिक्षण क्षेत्रात महत्त्वपूर्ण देवाणघेवाण झाली आहे. जपानी पर्यटकांना आकर्षित करण्यासाठी प्रयत्न केले गेले आहेत आणि अजिंठा परिसरात त्यांच्यासाठी सुविधा विकसित केल्या आहेत.

मुख्यमंत्री फडणवीस यांनी जपानच्या त्यांच्या दोन दौऱ्यांदरम्यान वाकायामा आणि कोयासन येथील भेटींचा उल्लेख करत म्हटले की, भारतीय संविधानाचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याचे कोयासन विद्यापीठात अनावरण हे दोन्ही देशांमधील मैत्रीचे प्रतीक आहे. २०२३ मध्ये, वाकायामाच्या दिवंगत राज्यपालांच्या उपस्थितीत सुमो कुस्तीगीरांच्या एका पथकाने मुंबईला भेट दिली. गेटवे ऑफ इंडिया संकुलात सुमो आणि भारतीय कुस्तीचे प्रात्यक्षिक दाखवण्यात आले आणि जनतेकडून त्यांना उत्साहाने दाद मिळाली. सध्या, जपानी सुमो कुस्तीगीर पुण्यातील बालेवाडी क्रीडा संकुलात प्रशिक्षण घेत आहेत.

जपानचे दिवंगत पंतप्रधान शिंजो आबे यांचे स्मरण करताना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, त्यांनी भारत-जपान संबंध मजबूत करण्यात महत्त्वाची भूमिका बजावली. त्यांच्या कार्यकाळात मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेनसारखे महत्त्वाकांक्षी प्रकल्प सुरू करण्यात आले. त्यांनी ४० किलोमीटर लांबीच्या भूमिगत मेट्रो आणि मुंबईत देशातील सर्वात लांब समुद्री पुलाच्या विकासाचीही नोंद घेतली.

अफगाणिस्तानातील बामियान बुद्धांच्या विध्वंसाच्या २५ व्या वर्धापन दिनानिमित्त, मुख्यमंत्र्यांनी राज्यपालांना नागपूरमध्ये एक प्रतिकृती स्थापित करण्याचा प्रस्ताव दिला. ते म्हणाले की, नागपूर हे ऐतिहासिकदृष्ट्या महत्त्वाचे आहे कारण येथेच डॉ. आंबेडकरांनी बौद्ध धर्म स्वीकारला आणि एक नवीन चळवळ सुरू केली. हा उपक्रम जगाला शांतीचा संदेश देईल.

## मी कार्यकर्त्यांच्या पाठिशी भक्कमपणे उभी

# सुनेत्रा पवारांचे आवाहन

■ **वृत्तसंस्था, पुणे, दि. १३ :** राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनानंतर राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यकर्त्यांमध्ये निर्माण झालेले नैराश्य झटकण्यासाठी आणि त्यांना नवी उभारी देण्यासाठी उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी आज पुण्यात पक्षाच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांशी संवाद साधला. या बैठकीत अजितदादांच्या आठवणीने सुनेत्रा पवार यांना अश्रू अनावर झाले. मात्र, अत्यंत भावूक वातावरणातही त्यांनी कार्यकर्त्यांना धीर देत, "अजितदादांचे स्वप्न पूर्ण करायचे आहे, खचून जाऊ नका," अशी साद घातली.



पुण्यात आयोजित या विशेष बैठकीत राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हा आणि शहर पातळीवरील सर्व मोठे पदाधिकारी उपस्थित होते. भाषणाला सुरुवात करताना सुनेत्रा पवार काहीशा भावूक झाल्या. अजितदादांच्या कार्याचा आणि त्यांच्या स्वप्नांचा उल्लेख करताना त्यांचा कंठ दाटून आला. "अजितदादांचे आपल्या सर्वांवर आणि या राज्यावर जे प्रेम होते, ते सार्थकी लावण्यासाठी आपल्याला त्यांचे अपूर्ण राहिलेले काम पूर्णत्वास न्यायचे आहे," असे त्यांनी सांगताच उपस्थित कार्यकर्त्यांचेही डोळे पाणावले.

अजित पवारांच्या जाण्याने कार्यकर्ते पोरके झाल्याची भावना राजकीय वतुर्ळात चर्चिली जात होती. यावर दिलासा देताना सुनेत्रा पवार म्हणाल्या, "तुमच्या पाठीशी आता कोणी नाही, असे कोणीही समजू नका. मी तुमच्या पाठीशी भक्कमपणे उभी आहे. संकटाच्या काळात खंबीर राहा आणि आपली संघटना अधिक मजबूत करण्यासाठी प्रयत्न करा." अजित पवार हे त्यांच्या शिस्तप्रिय आणि गतिमान कामासाठी ओळखले जात. त्यांच्या या कार्यपद्धतीचा आदर्श डोळ्यासमोर ठेवण्याचे आवाहन सुनेत्रा पवार यांनी कार्यकर्त्यांना केले. त्या म्हणाल्या, "दादा ज्या काटेकोर पद्धतीने आणि शिस्तीने प्रशासनावर पकड ठेवून काम करायचे, तशाच पद्धतीने आपल्याला काम पुढे न्यायचे आहे."

# गद्दारांपेक्षा निष्ठावान मुसलमान परवडला



■ **मुंबई :** एकनाथ शिंदेंनी अभ्यास केला पाहिजे. परभणीमध्ये भाजपचे 12 नगरसेवक हे मुस्लीम आहे हे एकनाथ शिंदे यांना माहिती आहे का? ते जीभ उचलून टाळीला लावतात का? या देशामध्ये, राज्यामध्ये मराठी भाषिक मुस्लीम आहेत ते काही घुसखोर नाही, आमचे तालुका प्रमुख आहेत, गेली अनेक वर्षे पक्षाचे काम करणारे एकनिष्ठ कार्यकर्ते आहेत, मुस्लीम म्हणून कार्यकर्त्यांला दूर ठेवणार का? तुमच्यासारख्या गद्दारांपेक्षा तो मुसलमान निष्ठावान परवडला, असा टोला खासदार संजय राऊत यांनी एकनाथ शिंदेंना लगावला आहे. संजय राऊत म्हणाले की, देशामध्ये मुस्लीम राज्यपाल आहेत, राष्ट्रपती मुस्लीम होऊन गेले, न्यायमूर्ती मुस्लीम होऊन गेले, एकनाथ शिंदेंना काय माहिती आहे ते अक्षर क्षत्रू आहेत. परभणीमध्ये जर भाजपला महापौर करण्याची संधी मिळाली असती तर त्यांनी सुद्धा मुस्लीमच महापौर केला असता. त्यांचे परभणीमध्ये 12 मुस्लीम नगरसेवक निवडून आले आहेत. हिंदू-मुस्लीम करण्यापलीकडे यांच्याकडे काही कार्यक्रमच नाही. अजित पवार यांच्या विमान अपघातावर चर्चा थांबवली पाहिजे. त्यावर रोहित पवार यांनी यांनी मांडलेले मुद्दे आणि पुरावे हे बोलके आहेत. संजय राऊत म्हणाले की, राज ठाकरे आणि मी नेहमी ऐकमेंकाना भेटत असतो. चंद्रपूरमध्ये जे घडले आहे त्यामध्ये उद्धव ठाकरेंची भूमिका नाही. ज्या पक्षाने आमचा पक्ष फोडला, चिन्ह चोरले त्या पक्षासोबत आम्ही का जावे? असा सवाल राऊतांनी केला आहे. अशा लोकांबरोबर पक्ष म्हणून सोबत जाण्याची भूमिका पक्ष म्हणून केलेली नाही. चंद्रपूरच्या लोकांचे आम्ही समर्थन केलेले नाही.

# अजितदादांची भाजपबाबतची भूमिका स्पष्ट होती



■ **मुंबई :** दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेसच्या संभाव्य विलीनीकरणाच्या चर्चेवरून राजकारण तापले असताना, राष्ट्रवादी काँग्रेसचे ( अजित पवार गट ) प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी आपली भूमिका स्पष्ट केली आहे. "विलीनीकरणाबाबत कोणताही प्रस्ताव किंवा विचार समोर आला, तर त्यावर पक्षपातळीवर चर्चा होईल. मात्र, आम्ही एनडीएचा घटक पक्ष असल्याने कोणताही मोठा निर्णय घेताना भाजपला विश्वासात घेणे अनिवार्य आहे," असे तटकरे यांनी ठणकावून सांगितले. दरम्यान, शरद पवार गटाचे नेते शशिकांत शिंदे यांनी अजित पवारांच्या भूमिकेबाबत केलेल्या दाव्याचाही त्यांनी तीव्र शब्दांत निषेध केला. विलीनीकरणाच्या संदर्भात पत्रकारांशी बोलताना सुनील तटकरे म्हणाले की, "जेव्हा एखादी चर्चा सुरू होईल, तेव्हा सुनेत्रा पवार आणि पक्षाचे वरिष्ठ नेते त्यावर विचार करतील. त्यामुळे भविष्यातही अशा प्रकारच्या मोठ्या निर्णयावेळी आघाडीतील मुख्य पक्षाशी चर्चा करावीच लागेल." शशिकांत शिंदे यांनी पक्षाच्या मुखपत्रात दावा केला होता की, अदृश्य शक्तीच्या कारवाया, धमक्या व खोटे नाटे षडयंत्र करून केलेले आरोपांमुळे अजितदादांना राष्ट्रीवादीतून बाहेर पडून, वेगळा गट स्थापन करावा लागला होता.

## तीन हजार रुपयांच्या लाचेप्रकरणी

# ग्रामसेवकावर गुन्हा

■ **महासागर प्रतिनिधी ठाणे, दि. १३ :** आसनगाव येथील ग्रामपंचायत कार्यालयातील ग्रामसेवक हिरामण तरवारे यांच्यावर तीन हजार रुपयांची लाच मागितल्याप्रकरणी गुन्हा दाखल झाला आहे. तक्रारदार यांच्या पत्नीच्या नावाने घरपट्टी करुन देण्यासाठी ग्रामसेवकाने लाच मागितल्याचे निष्पन्न झाले आहे.

तक्रारदार यांनी आसनगाव भागात घर विकत घेतले होते. त्याची घरपट्टी तक्रारदार यांच्या पत्नीच्या नावाने करायची होती. २९ ऑक्टोबरला तक्रारदार हे ग्रामपंचायतीत गेले असता, ग्रामसेवक हिरामण यांनी त्यांच्याकडून पाच हजार रुपयांच्या लाचेची मागणी केली. याप्रकरणी तक्रारदार यांनी ठाणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार दिल्यानंतर पथकाने याप्रकरणाचा तपास सुरु केला.

पथकाने पंच साक्षीदार यांच्या समक्ष पडताळणी कारवाई केली असता, हिरामण यांनी एका पंचा समक्ष तक्रारदार यांच्याकडे कायदेशीर मोबदल्या व्यतिरिक्त ३ हजार ५०० रुपयांच्या आणि तडजोडी अंती तीन हजार रुपये लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले. याप्रकरणी त्यांच्याविरोधात शहापूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.

# दिव्यांग क्षेत्रातील संस्थांसाठी नोंदणी बंधनकारक : सचिव तुकाराम मुंढे

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १३ :** राज्यात दिव्यांग व्यक्ती अधिनियम अंतर्गत दिव्यांगासाठी कार्यरत संस्थांना दिव्यांग कल्याण आयुक्त यांच्याकडे नोंदणी असणे अनिवार्य आहे. राज्यात साधारणतः दोन हजारांहून अधिक संस्था दिव्यांगांच्या कल्याणासाठी कार्यरत आहेत. यापैकी सुमारे ९०० संस्था विविध कारणांमुळे अपात्र ठरल्याने त्यांच्यावर विभागाने कारवाई करून त्यांची नोंदणी रद्द केली असल्याचे दिव्यांग कल्याण विभागाचे सचिव तुकाराम मुंढे यांनी सांगितले. विशेष म्हणजे सन २०२५ या वर्षातच ३६३ संस्थांची नोंदणी रद्द करण्यात आली आहे. नोंदणी रद्द केलेल्या संस्थांमध्ये कोकण ५२, नाशिक ४९, पुणे ६०, नागपूर ४९, अमरावती ५० आणि छत्रपती संभाजीनगर विभागातील १०३ संस्थांचा समावेश आहे.



सचिव तुकाराम मुंढे म्हणाले, संस्था सोसायटी नोंदणी कायदा १८६०, बॉम्बे पब्लिक ट्रस्ट कायदा,१९५० किंवा कंपनी कायदा (कलम ८) अंतर्गत नोंदणीकृत असल्यानंतरसुद्धा दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, २०१६ च्या कलम ५० अंतर्गत नोंदणी बंधनकारक आहे. विभागाने केलेल्या कारवाईमुळे शासनाचा निधी योग्य संस्थांवर खर्च होईल.

ज्या संस्था दिव्यांग क्षेत्रात कार्यरत आहेत किंवा कार्य करू इच्छितात त्यांनी दिव्यांग कल्याण आयुक्तालयाकडे नोंदणी करणे आवश्यक आहे. नोंदणी न केल्यास संबंधित संस्थांवर अधिनियमातील कलम ९१ नुसार कारवाई करण्यात येणार असल्याचे दिव्यांग कल्याण विभागाचे सचिव तुकाराम मुंढे यांनी स्पष्ट केले आहे.

सचिव मुंढे म्हणाले, दिव्यांग क्षेत्रात काम करणाऱ्या सर्व नागरी समाज संघटनांच्या, संस्थांच्या कामकाजात एकसमानता यावी. तसेच त्यांची जबाबदारी आणि सेवांची गुणवत्ता सुनिश्चित करणे, नागरी समाज संघटना, संस्थांची नोंदणी, तपासणी, देखरेख, नूतनीकरण, जबाबदारी व पारदर्शकता निश्चित करण्यासाठी कार्यप्रणाली १७ ऑक्टोबर २०२५ च्या शासन निर्णयानुसार निश्चित करण्यात आली आहे. यानुसार संस्थांनी शासनाकडून वेळोवेळी निर्गमित करण्यात आलेल्या सुगम्यता तत्त्वे व इतर मानकांचे पालन करणे आवश्यक आहे.

## दहेगाव शिवारात ट्रक व तीन टँकरचा अपघात

# इंदूर-पुणे मार्ग १० तास ठप्प

■ **महासागर प्रतिनिधी, नाशिक, दि. १३ :** शहरातून जाणाऱ्या इंदूर-पुणे राष्ट्रीय महामार्गावर, दहेगाव शिवारात गुरुवारी पहाटे ६:३० च्या सुमारास एक मालट्रक आणि इंधन वाहतूक करणाऱ्या तीन टँकरमध्ये भीषण अपघात झाला. या तिहेरी अपघातामुळे गुरुवारी सायंकाळपर्यंत महामार्गावरील वाहतुकीचा बोजवारा उडाला. या घटनेत दोन चालक जखमी झाले आहेत.

पानेवाडी येथील तेल कंपन्यांमधून इंधनाने भरलेले तीन टँकर पाठोपाठ एक मालेगावकडे जात होते. दहेगाव शिवारात मालेगावकडून मनमाडकडे भरधाव वेगाने येणाऱ्या मालट्रकने पहिल्या टँकरला समोरून जोरदार धडक दिली. ट्रक आणि पहिला टँकर रस्त्याच्या खाली उलटले. त्याच वेळी मागील दोन टँकरचीही एकमेकांना धडक बसली, मात्र ते जागीच थांबले. या अपघातात उलटलेल्या टँकरमधून इंधन गळती सुरू झाल्याने परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. मात्र, तातडीने उपाययोजना केल्या गेल्याने मोठा अनर्थ टळला. अपघातामुळे इंदूर-पुणे राष्ट्रीय मार्गावरील दुहेरी वाहतूक पूर्णपणे ठप्प झाली. याचा सर्वाधिक फटका सकाळी कामावर जाणाऱ्या चाकरमान्यांसह शालेय विद्यार्थ्यांना बसला.

# परप्रांतीय तरुणाची धारदार शस्त्राने निर्घृण हत्या

■ **वृत्तसंस्था, पुणे, दि. १३ :** पुणे-नगर महामार्गावरील कोरेगाव भीमा (ता. शिरूर) येथील आपलं घर हॉटेलच्या मागे एका परप्रांतीय तरुणाची निर्घृण हत्या करण्यात आली. या घटनेत मृतक तरुणाचे नाव सुकेन महातो (रा. ओडिशा) आहे. शिक्रापूर पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, त्याच्यावर धारदार शस्त्राने वार करून हत्या करण्यात आली असून, हत्येचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेलं नाही.

घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. घटनास्थळावर सुकेन महातोचा मृतदेह रक्ताच्या थारोळ्यात पडलेला आढळला. मृतक हा मूळचा ओडिशाचा रहिवासी असून कामाच्या निमित्ताने पुण्यात वास्तव्यास होता. पोलिस तपास करत आहेत की ही हत्या जुन्या वादातून झाली की अन्य कोणत्यातरी कारणामुळे, तसेच आरोपींना ताब्यात घेण्यासाठी स्थानिक गुन्हे शाखेची मदत घेतली जात आहे.

घटनेची गंभीरता ओळखून शिरूर येथील फॉरेन्सिक विभागालाही घटनास्थळी पाचारण करण्यात आले. घटनास्थळावरून महत्त्वाचे पुरावे गोळा करण्यात आले आहेत. आरोपींच्या शोधासाठी चार पथके तयार केली गेली असून, पोलिस निरीक्षक दीपरतन गायकवाड यांनी सांगितले की, पथक तांत्रिक विश्लेषण आणि खबऱ्यांच्या मदतीने आरोपींचा माग घेत आहे. या घटनेनंतर पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी ट्विट करत गुन्हेगारांना तात्काळ अटक करून कठोर शिक्षा देण्याची मागणी केली. बॅनर्जी म्हणाल्या, महाराष्ट्रातील पुण्यात पुरुलियातील बंदवान येथील २४ वर्षीय स्थलांतरित कामगार सुखेन महातो यांच्या क्रूर हत्येने मला हादरवले आहे.

# मुंबई बांगलादेशी घुसखोर आणि अंमली पदार्थ मुक्त करणार : एकनाथ शिंदे

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १३ :** येत्या काळात मुंबई बांगलादेशी घुसखोर आणि अंमलीपदार्थमुक्त करण्याचा निर्धार राज्य सरकारने केला असून त्यासाठीचा कृती आराखडाही तयार करण्यात आल्याची माहिती उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी गुरुवारी दिली. बांगलादेशी घुसखोरांविरोधात कठोर मोहीम राबविण्याचे आदेश देण्यात आल्याचेही त्यांनी सांगितले.

मुंबई शहर जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीनंतर माध्यमांशी शिंदे बोलत होते. या बैठकीत जिल्हा वार्षिक योजना २०२६-२७ साठी वाढीव मागणीसह ८१३ कोटी ३५ लाख ७२ हजार रकमेच्या प्रारूप आराखड्यास मान्यता देण्यात आली. यामध्ये जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) ७८५.३५ कोटी, अनुसूचित जाती उपयोजना २८ कोटी आणि आदिवासी उपयोजना क्षेत्राबाहेरील योजनांसाठी ७२ हजार इतक्या रकमेचा समावेश आहे. जिल्हा नियोजन समितीच्या निधीमधून होणारी विकास कामे विहित कालमयार्देत, गुणवत्तापूर्ण आणि दर्जेदार करावीत. यासाठी कार्यान्वयीन यंत्रणांनी, टीम वर्कने मंजूर निधी विहित कालावधीत १०० टक्के खर्च करावा, अशा सूचना शिंदे यांनी दिल्या. तसेच ज्या यंत्रणा त्यांचा मंजूर निधी व कामे विहित कालावधीत पूर्ण करणार नाहीत अशा यंत्रणेच्या अधिकाऱ्यांवर कारवाई केली जाईल, असा



इशाराही त्यांनी यावेळी दिला.

कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री मंगल प्रभात लोढा, आमदार सचिन अहिर, सुनील शिंदे, प्रसाद लाड, मनिषा कायंदे, चित्रा वाघ, अजय चौधरी, अमीन पटेल, महेश सावंत, मनोज जामसुतकर, शिवाजीराव गर्जे, जगन्नाथ अभ्यंकर, ज्योती गायकवाड, महापालिका आयुक्त भूषण गगराणी, जिल्हाधिकारी आंचल गोयल, जिल्हा नियोजन अधिकारी विजय भोपळे आदी उपस्थित होते.

शहरात जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून केली जाणारी कामे अत्यंत दर्जेदार असावीत. मुंबईत येणाऱ्या प्रत्येक नागरिकाला या कामांचा हेवा वाटावा अशी विकास कामे व्हावीत. यासाठी यंत्रणांनी टीम वर्कने कामे करावीत, अशा सूचना शिंदे यांनी दिल्या. शहरातील उद्यानांमध्ये स्वच्छ पिण्याचे पाणी आणि शौचालय व्यवस्था करण्यात यावी. भटक्या कुत्र्यांचा नागरिकांना त्रास होऊ नये यासाठी कायमस्वरुपी डॉग शेल्टर करण्यासाठी महापालिकेने जागा निश्चित करावी. शहरात रहदारीच्या ठिकाणी नागरिकांना कोणत्याही प्रकारची समस्या उद्भवू नये यासाठी अशा ठिकाणांची महापालिकेने तपासणी करून त्या ठिकाणाचे अनधिकृत स्टॉल काढण्याची कार्यवाही करावी.

बाजारपेठेंमध्ये नागरिकांची विशेषतः महिलांची गैरसोय होऊ नये, यासाठी अशा ठिकाणी फिरते शौचालयची व्यवस्था निर्माण करावी. महात्मा फुले जन आरोग्य योजनेतून नागरिकांना दर्जेदार विनासायास आरोग्य सुविधा या बरोबरच महापालिकेच्या रुग्णालयात झिरो प्रिस्क्रिप्शन सुविधा दिल्या जात आहेत.

## छत्रपती शिवाजी महाराज यांच्या १२ किल्ल्यांचे जागतिक वारसा प्रमाणपत्र

# यूनेस्कोकडून मंत्री ॲड. आशिष शेलार यांनी स्वीकारले

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १३ :** छत्रपती शिवाजी महाराजांच्या 12 किल्ल्यांना युनेस्कोने जागतिक वारसा स्थळांच्या यादीत स्थान दिले आहे. त्यासंदभार्तील युनेस्कोचे अधिकृत प्रमाणपत्र सांस्कृतिक कार्य व माहिती तंत्रज्ञान मंत्री ॲड. आशिष शेलार यांनी युनोस्कोच्या फ्रान्स येथील कार्यालयात जाऊन स्वीकारले.

यूनेस्को मुख्यालयामध्ये महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागातर्फे उभारण्यात आलेल्या भारतरत्न महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळ्यास मंत्री ॲड.शेलार यांनी पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले. दीड वर्षांच्या प्रदीर्घ प्रक्रियेनंतर गतवर्षी 11 जुलै 2025 रोजी, यूनेस्कोच्या 47व्या अधिवेशनात, मराठा मिलिटरी लँडस्केप्स ऑफ इंडिया या नावाने छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळातील 12 किल्ल्यांना जागतिक वारसा यादीत स्थान देण्यात आले. या मानांकनाचे अधिकृत




प्रमाणपत्र महाराष्ट्राचे सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. शेलार यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने पॅरिस येथे स्वीकारले.

छत्रपती शिवाजी महाराजांनी परकीय आक्रमणाशी लढून उभारलेल्या हिंदवी स्वराज्याचे रक्षण, सुरक्षित शासनव्यवस्था आणि लोककल्याण, यासाठी साकारलेली गड-किल्ल्यांची साखळी हा भारतीय इतिहासातील अद्वितीय लष्करी व राज्यकारभाराचा नमुना मानला जातो.

रायगड, राजगड, प्रतापगड, पन्हाळा, शिवनेरी, लोहगड, साल्हेर, सिंधुदुर्ग, सुवर्णदुर्ग, विजयदुर्ग, खांदेरी आणि तामिळनाडूमधील जिंजी असा 12 किल्ल्यांचा समूह जागतिक वारसा स्थळ म्हणून संपूर्ण जगासमोर उभा राहिला आहे. या निर्णयाच्या पार्श्वभूमीवर फेब्रुवारी 2025 मध्ये मंत्री ॲड. शेलार यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्र शासनाचे चार सदस्यीय प्रतिनिधीमंडळ पॅरिसमध्ये युनेस्कोसमोर तांत्रिक आणि धोरणात्मक मांडणी करून या मानांकनासाठी सादरीकरण आणि युक्तीवाद करून आले होते. आता प्रत्यक्ष मानांकन-पत्र मिळाले आहे.

छत्रपती शिवाजी महाराज यांचा पराक्रमाचा आणि मराठा साम्राज्याच्या वारशाचा जागतिक सन्मान स्वीकारताना आज ऊर भरून आला आहे. या संपूर्ण प्रक्रियेत प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केलेले मार्गदर्शन आणि परिश्रम तसेच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या योगदानाबद्दल मंत्री ॲड. शेलार यांनी आभार मानले आहेत.

भारताचे युनेस्कोमधील स्थायी प्रतिनिधी विशाल शर्मा यांनीही परिश्रमपूर्वक केलेल्या प्रयत्नांबद्दल त्यांचेही तमाम महाराष्ट्रातर्फे मंत्री ॲड. शेलार यांनी आभार मानले. तसेच हा महाराष्ट्रासाठी, देशासाठी शिवप्रेमींसाठी गौरवाचा क्षण असल्याचेही त्यांनी म्हटले आहे. भारत संविधानाला 75 वर्ष पूर्ण झाल्याच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र शासनाने भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा अर्धपुतळा युनेस्को मुख्यालयाला भेट दिला असून, 26 नोव्हेंबर 2025 रोजी संविधान दिनानिमित्त या पुतळ्याची स्थापना पॅरिसमध्ये युनेस्को मुख्यालयात झाली आहे. सामाजिक न्याय, समानता, बंधुता आणि शिक्षणाद्वारे सक्षमीकरण यांची डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेली शिकवण ही युनेस्कोच्या मुलभूत ध्येयाशी सुसंगत आहे. पॅरिसमधील त्यांच्या या स्मारकाला मंत्री शेलार यांनी अभिवादन केले. यावेळी विशाल शर्मा यांच्यासह विभागाचे डॉ. सचिव किरण कुलकर्णी, पुरातत्व विभागाचे सहाय्यक संचालक हेमंत दळवी आणि मान्यवर उपस्थित होते.

# इंजिनिअरची दरीत उडी घेत आत्महत्या

■ **वृत्तसंस्था, पुणे, दि. १३ :** पुण्यातील एका अभियंत्याने पत्नीसोबत झालेल्या किरकोळ वादातून 250 फूट खोल दरीत उडी घेऊन स्वतःची जीवनायात्रा संपवल्याची धक्कादायक घटना घडली आहे. या घटनेमुळे राज्यातील आयटी क्षेत्रात एकच खळबळ माजली आहे.

यासंबंधीच्या माहितीनुसार, विरेंद्र सिन्हा (32) असे मृत आयटी इंजिनिअरचे नाव आहे. ते पुण्यील हिंजवडी आयटी पार्क परिसरातील एका कंपनीत कार्यरत होते. त्यांनी लोणावळ्यातील लायन्स पॉईंट येथील एका खोल दरीत उडी घेत आत्महत्या केली. त्यांची कार गुरूवारी सकाळी लायन्स पॉईंट येथे संशयास्पद स्थिती पार्क केल्याचे आढळली. तत्पूर्वी, त्यांनी आपल्या मित्रांना व पत्नीला ईमेल व फोन मेसेजद्वारे आपण टोकाचे पाऊल उचलणार असल्याचे कळवले होते. त्यानंतर त्यांनी स्थानिक पोलिसांना ही बाब कळवली. त्यानंतर पोलिसांनी शोध मोहिम राबवली असता त्यांचा मृतदेह खोल दरीत आढळला. विरेंद्र सिन्हा यांनी ज्या ठिकाणी आपली कार उभी केली होती. त्याच्याच समोरील दरीत सुमारे 200 ते 250 फूट खोल अंतरावर त्यांचा मृतदेह आढळला. स्थानिक बचाव पथक शिवदुर्गच्या सदस्यांच्या मदतीने गुरूवारी सायंकाळी 4.30 च्या सुमारास त्यांचा मृतदेह बाहेर काढण्यात आला. त्यानंतर तो पुढील कारवाईसाठी पोलिसांच्या ताब्यात देण्यात आला. विरेंद्र सिन्हा यांच्या पत्नीचा 12 फेब्रुवारी रोजी वाढदिवस होता. तविरेंद्र यांनी बुधवारी मध्यरात्रीपासून पत्नीशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला. पण त्यांचा फोन नंबर ब्लॉक असल्यामुळे त्या दोघांचे बोलणे होऊ शकले नाही.

# तुडुंब कचऱ्यामुळे गुदमरतोय शहराचा श्वास

## प्रशासक राजवटीतील स्वच्छतेचा बोजवारा जैसे थे

**नागरिकांचा संताप**



**महासागर प्रतिनिधी**


**अमरावती,( दि.13 )** – शहरातील स्वच्छतेचे दावे आणि वास्तवातील अस्वच्छता यातील दरी पुन्हा एकदा उघड झाली आहे. स्वामी विवेकानंद बेलपुरा, फ्रेजरपूरा आणि रुक्मिणी नगर या प्रभागांच्या सीमेवरून वाहणारा नाला कचऱ्याने तुडुंब भरलेला असल्याचे धक्कादायक चित्र समोर आले असून, प्रशासक राजवटीतील कारभार सभागृहाच्या स्थापनेनंतरही कायम असल्याने नागरिकांकडून तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे.

दरवर्षी नाले सफाई मोहिमेची घोषणा केली जाते; परंतु प्रत्यक्षात नाल्यांमध्ये साचलेला प्लास्टिक, घनकचरा आणि दुर्गंधी प्रशासनाच्या दाव्यांवर पाणी फेरत आहे. साचलेल्या कचऱ्यामुळे पाण्याचा प्रवाह ठप्प झाला असून, डासांचे प्रमाण वाढण्यासह आरोग्याच्या समस्या निर्माण झाली आहे. स्थानिक रहिवाशांच्या मते, प्रशासक राजवटीत स्वच्छतेचा प्रश्न अधिकच गंभीर बनला होता, तो अजून तसाच आहे. 'आदेशांची केवळ कागदोपत्री पूर्तता होते; जमिनीवर मात्र कामाचा ठसा दिसत नाही,'. जागोजागी कचऱ्याचे ढीग, तुंबलेले नाले आणि वाढती अस्वच्छता पाहता प्रशासनाची कार्यक्षमता प्रश्नांकित होत आहे.

ठेका पद्धतीतील कामकाजावरही नागरिकांनी सवाल उपस्थित केले आहेत. 'कोट्यवधींचे ठेके दिले जातात; पण कामाची गुणवत्ता आणि जबाबदारी कुठे आहे?' स्वच्छतेच्या मूलभूत सेवांमध्ये सातत्य आणि काटेकोर देखरेख नसल्याचा आरोपही करण्यात आला. प्रशासक राजवटीत अपेक्षित सुधारणा नव्हत्या, मात्र आता उलट परिस्थिती बिघडत चालली आहे. शहराच्या आरोग्याशी निगडित असलेल्या या प्रश्नाकडे तातडीने लक्ष देऊन ठोस उपाययोजना राबवाव्यात, अन्यथा नागरिकांच्या रोषाला सामोरे जावे लागेल, यात दुमत नाही. शहराचा श्वास गुदमरू नये, यासाठी प्रशासनाने केवळ घोषणा नव्हे तर प्रभावी कृती दाखवण्याची वेळ आली आहे.

# ओव्हरलोड ट्रकचा विद्युत तारांना स्पर्श

## रस्त्यावर ठिणग्या, मोठी दुर्घटना टळली ▌ कडक कारवाईची मागणी





**महासागर प्रतिनिधी**

**अंजनगाव सुर्जी, ( दि.13 )** – स्थानिक वीज वितरण कंपनीच्या कार्यालयाजवळील बोराळा रस्त्यावर ओव्हरलोड ट्रकचा विद्युत तारांना स्पर्श झाल्याने रस्त्यावर ठिणग्या उडाल्या. या घटनेमुळे परिसरात काही काळ भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. सुदैवाने मोठी दुर्घटना टळली.

याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, 12 फेब्रुवारी रोजी सायंकाळी आठ ते साडेआठ वाजताच्या दरम्यान बोराळा रस्त्याकडून अंजनगाव मार्गावर जाणारा ट्रक (क्रमांक एमएच-41, एयू 5275) मोठ्या प्रमाणात ओव्हरलोड अवस्थेत होता. ट्रकमध्ये कापसाच्या रुईच्या गठाणांचा प्रचंड माल भरलेला होता. या ओव्हरलोड मालाचा एल.टी. 440 व्होल्टच्या विद्युत तारांना स्पर्श झाल्याने रस्त्यावर ठिणग्या उडाल्या. अचानक झालेल्या या प्रकारामुळे रस्त्यावरील वाहनधारक तसेच नागरिकांमध्ये घबराट पसरली. घटनास्थळी त्या वेळी दुचाकी वाहने उभी होती, तसेच स्त्री-पुरुष व लहान मुलेही ये-जा करत होती. त्यामुळे गंभीर अपघाताची शक्यता निर्माण झाली होती. विद्युत तारांना झालेल्या स्पर्शामुळे स्टेट बँकेची डीपी काही काळासाठी बंद पडल्याची माहिती आहे. घटनेच्या शेजारीच वीज वितरण कंपनीचे कार्यालय असल्याने कर्मचारी दीपक गावंडे, ऋषिकेश पवार, गणेश नागापुरे, विवेक वानखडे व ऋषिकेश पालखेडे यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. त्यांनी ट्रक चालकाला खडसावून तुटलेल्या तारांमुळे झालेल्या नुकसानीची भरपाई करण्यास सांगितले. दरम्यान, ट्राफिक पोलीस कर्मचारी राजू मेसरे व त्यांचे सहकारी कासदेकर घटनास्थळी पोहोचले. त्यांनी ट्रकचा फोटो काढून चालकावर चलनाची कारवाई केल्याचे समजते.

### कडक कारवाईची नागरिकांची मागणी

ओव्हरलोड ट्रकमुळे मोठी दुर्घटना घडण्याची शक्यता होती. संबंधित ट्रकविरुद्ध अधिक कठोर कारवाई करणे गरजेचे असल्याची चर्चा नागरिकांमध्ये सुरू होती. अशा प्रकारच्या ओव्हरलोड वाहनांमुळे भविष्यात मोठे अपघात होऊ शकतात, अशी प्रतिक्रिया स्थानिकांनी व्यक्त केली.

### बोराळा रस्त्यावर वाढती जड वाहतूक

बोराळा येथील गणेश मंदिराकडे जाणारा रस्ता तुलनेने अरुंद आहे. या मार्गावरून भाविक, आबालवृद्ध तसेच स्थानिक प्रवासी मोठ्या संख्येने ये-जा करतात. परिसरात जिनिंग-प्रेसिंग उद्योग असल्याने जड वाहनांची वाहतूक वाढली आहे. परिणामी रस्त्याची अवस्था खालावत असून भविष्यात अपघाताचा धोका वाढत आहे. पोलिसांनी व संबंधित यंत्रणांनी वेळीच लक्ष देण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.

# किडनी देवून वडीलांनी वाचविले मुलाचे प्राण

## सुपर स्पेशलिटी हॉस्पिटलमध्ये झाले किडनी प्रत्यारोपण

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.13 )**- स्थानिक विभागीय संदर्भ सेवा रुग्णालय ( सुपर स्पेशलिटी) हॉस्पिटल मध्ये 67 वी किडनी प्रत्यारोपण शस्त्रक्रिया पूर्ण करण्यात आली. सदर रुग्ण हा एक वर्षांपासून किडनी आजाराने त्रस्त असल्याने त्यासाठी बाहेर उपचार चालू होते व काही वर्षांपासून डायलिसिस करीत होता. त्यावेळी डॉक्टरांनी रुग्णास व त्याच्या कुटुंबीयास किडनी प्रत्यारोपण विषयी माहिती दिली.

त्यानुषंगाने 24 वर्षीय प्रतीक गणेश घुरडे यांची शस्त्रक्रिया आज शुक्रवारी यशस्वीरित्या पूर्ण करण्यात आली आहे. सदर रुग्ण हा अंजनगाव सुर्जी तालुक्यातील कसबेगव्हाण येथील रहिवासी असुन मागील काही महिन्यांपासून डायलिसिस चालु होते. मात्र, डायलिसिस यावर दीर्घकाळ उपाय नसून व होणारा त्रास बघुन किडनी प्रत्यारोपण हा यावरील योग्य उपाय आहे, असे जेव्हा डॉक्टरांनी सांगितले. त्यावेळी मुलाच्या पुढील भविष्याचा विचार करून वडील गणेश गोविंदराव घुरडे (60 वर्ष )यांनी आपली एक किडनी मुलगा प्रतीकला देण्याचा निर्णय घेतला व आपली एक किडनी प्रतीकला देऊन त्याला नवीन जीवन दिले. महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजने अंतर्गत शस्त्रक्रिया विनामुल्य करण्यात आली. सुपर स्पेशलिटी हॉस्पिटल येथील वैद्यकीय अधीक्षक डॉ. अमोल नरोटे व विशेष कार्य अधिकारी डॉ. मंगेश मेंढे यांच्या मार्गदर्शनात नेफरोलॉजिस्ट डॉ. अविनाश चौधरी, युरो सर्जन डॉ.राहुल पोटोडे, डॉ.विक्रम देशमुख, डॉ. राहुल घुले, डॉ. प्रतिक चिरडे, डॉ. विशाल बाहेकर, बधिरिकरण तज्ञ डॉ. रोहित हातगावकर, डॉ. बाळकृष्ण बागवाले, डॉ. दिपाली देशमुख, डॉ. शितल सोळंके, डॉ. अश्विनी मडावी, डॉ.विक्रांत कुळमेथे, डॉ.माधव ढोपरे,डॉ. जयश्री पुसदेकर, डॉ.नाहीद, डॉ. रमणीय,डॉ. उज्वल अभ्यंकर, डॉ. प्रियंका कांबळे, डॉ. श्रद्धा जाधव यांच्यासह अन्यंनी सहकार्य केले.

# चर्मउद्योगाच्या खोक्याला आग

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.13 )**- शेगाव नाका रोडवरील न्यू कॉटन मार्केटजवळील चर्मउद्योगाच्या दोन स्टॉलला शुक्रवारी (दि. 13) सकाळी आग लागल्याची घटना घडली. या आगीत अंदाजे दोन लाख रुपयांचे नुकसान झाल्याचा प्राथमिक अंदाज असून, सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही.

सकाळी 10.32 वाजता मोहम्मद साद घाणेवाले यांनी अग्निशमन मुख्यालयाच्या नियंत्रण कक्षाला फोनद्वारे आग लागल्याची माहिती दिली. माहिती मिळताच पाळी प्रमुख सुनील काकडे यांच्या आदेशानुसार अग्निशमन दलाचे वाहन तात्काळ घटनास्थळी रवाना झाले. घटनास्थळी पोहोचल्यानंतर वाहन चालक संतोष डोईफोडे तसेच फायरमन अमोल साळुंखे व विकी हिवराळे यांनी होजरील पाईपच्या साहाय्याने आगीवर नियंत्रण मिळविण्याचे प्रयत्न सुरू केले.

### अंदाजे दोन लाखांचे नुकसान

सुमारे 30 ते 40 मिनिटांच्या अथक प्रयत्नांनंतर आगीवर पूर्णपणे नियंत्रण मिळविण्यात यश आले. या आगीत चर्मउद्योग व्यावसायिक मोहम्मद साद घाणेवाले व रितेश अटवर्धन यांचे अंदाजे दोन लाख रुपयांचे नुकसान झाले आहे.


## जाहिरात

जन्म प्रमाण पत्र मिळने बाबत शिवा शोभाराम जाम्बेकर रा. खापरखेड़ा ता. धारणी यांचा जन्म दिनांक 31/12/2011रोजी गांव खापरखेड़ा ता. धारणी येथे झालेला आहे. या बाबत ग्राम पंचायतमध्ये नोंद नाही परंतु यांना जन्म दाखल्याची आवश्यकता आहे. करिता कोनाला या बाबत आक्षेप असल्यास त्यांनी 30 दिवसात आक्षेप दाखल करावे. सदर प्रसिद्धि ग्रामपंचायत खापरखेड़ा ता. धारणी येथे नोटिस बोर्ड वर लावण्यात आली आहे.

**शिवा शोभाराम जाम्बेकर**


# नदीपात्रात आढळला कुजलेला मृतदेह

**महासागर प्रतिनिधी**

**तिवसा, ( दि.13 )**- तालुक्यातील शेंदोळा खुर्द येथे शुक्रवारी (दि. 13 ) सकाळी घडलेल्या एका धक्कादायक घटनेने संपूर्ण परिसरात भीतीचे सावट पसरले आहे. गावाजवळील सूर्यगंगा नदीच्या पात्रात एका अज्ञात इसमाचा कुजलेल्या अवस्थेतील मृतदेह आढळून आल्याने ग्रामस्थांमध्ये एकच खळबळ उडाली.

प्राप्त माहितीनुसार नेहमीप्रमाणे सकाळी सुमारे 7 वाजताच्या सुमारास काही शेतकरी व मजूर शेताकडे निघाले असताना गावालगतच असलेल्या नदीकाठी झाडा जवळील भागात पाण्यात काहीतरी तरंगताना दिसले. जवळ जाऊन पाहिले असता तो एका पुरुषाचा मृतदेह असल्याचे स्पष्ट झाले. ही माहिती वाऱ्यासारखी गावभर पसरताच घटनास्थळी नागरिकांची मोठी गर्दी उसळली. घटनेची माहिती मिळताच तिवसा पोलिस तातडीने घटनास्थळी दाखल झाले. पंचनामा करून मृतदेह बाहेर काढण्यात आला. प्राथमिक निरीक्षणात मृतदेह गेल्या सहा ते सात दिवसांपासून पाण्यात असल्याचा अंदाज व्यक्त करण्यात येत आहे. पाण्यातील मासे व इतर प्राण्यांनी मृतदेहाचे काही भाग विद्रूप केल्याने ओळख पटविणे कठीण झाले आहे. मृतदेह नागरिकांच्या मदतीने बाहेर काढण्यात आला.

### रहस्यमय मृत्यूमुळे संपूर्ण तालुक्यात चर्चेला उधाण

दरम्यान, या घटनेमुळे शेंदोळा खुर्द गावात भीतीचे वातावरण निर्माण झाले असून नागरिक विविध तर्क-वितर्क लावत आहेत. संबंधित इसमाबाबत कोणाकडे माहिती असल्यास त्वरित तिवसा पोलिसांशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे. सूर्यगंगा नदीपात्रातील या रहस्यमय मृत्यूमुळे संपूर्ण तालुक्यात चर्चेला उधाण आले असून, तपासातून नेमके सत्य काय समोर येते याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.


**महाराष्ट्र शासन**
**मृद व जलसंधारण विभाग,**
**अप्पर आयुक्त जलसंधारण तथा मुख्य अभियंता, मृद व जलसंधारण प्रादेशिक क्षेत्र, नागपूर**
**प्रादेशिक जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण विभाग, अमरावती**
**जिल्हा जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण विभाग अमरावती**
**ई-निविदा कार्यप्रणाली अंतर्गत**
**ई-निविदा सुचना क्र. ब-1/16 सन 2025-26**
**( फक्त अमरावती जिल्ह्यातील सुशिक्षित बेरोजगार अभियंता करीता राखीव )**

महाराष्ट्र राज्याच्या राज्यपालांच्या वतीने कार्यकारी अभियंता तथा जिल्हा जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण विभाग, अमरावती हे खालील दर्शविलेल्या कामांसाठी फक्त अमरावती जिल्ह्यातील सुशिक्षित बेरोजगार अभियंता करीता राखीव संवर्गातुन सार्वजनिक बांधकाम विभागामध्ये नोंदणीकृत असलेल्या सक्षम निविदादारांकडून ई- निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्रे शासनाचे संकेतस्थळ https://mahatenders.gov.in येथुन डाऊनलोड करण्यात यावीत. सविस्तर निविदा सूचना व ई निविदेबाबत सर्व माहिती शासनाच्या संकेतस्थळावर व विभागीय कार्यालयाच्या सूचना फलकावर उपलब्ध आहे.

निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता तथा जिल्हा जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण विभाग, अमरावत्ती यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्वीकारली जाणार नाही. सदर निविदा सूचनेमध्ये काही बदल होत असल्यास https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर कळविण्यात येईल. विभागीय कार्यालयाच्या सूचना फलकावर उपलब्ध करून देण्यात येईल.

| अ.क्र. | कामाचे नांव | निविदा किंमत रूपये | कोऱ्या निविदा संचाची किंमत | कंत्राटदाराचा वर्ग |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ६ |
| १ | डॉ. पंजाबराव देशमुख वैद्यकिय महाविद्यालय रुग्णालय व अनुसंधान केंद्र अमरावती येथील 1 कांतानगर रोडवरील नल्याचे खोलीकरण व सुरक्षा भिंत बांधकाम करणे ता. अमरावती जि. अमरावती | 34,99,876/- | 2360/- | फक्त अमरावती जिल्ह्यातील सुशिक्षित बेरोजगार अभियंता करीता राखीव |

जिल्हा - अमरावती

ई निविदा उपलब्ध कालावधी :- निविदा विक्री दि. 16/02/2026 ते दिनांक 23/02/2026

ई-निविदा सादरीकरण :- निविदा विक्री दि. 16/02/2026 ते दिनांक 23/02/2026

ई- निविदा उघडण्याचा दिनांक :- दिनांक 25/02/2026 (शक्य झाल्यास)

खालील ठिकाणी ई-निविदा बाबत सर्व माहिती उपलब्ध आहे.

1. संकेतस्थळ- http://mahatender.gov.in

(सदर निविदे सूचनेमध्ये काही बदल होत असल्यास वरील वेबसाईटवर कळविण्यात येईल.)

2. जिल्हा जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण विभाग, अमरावती कार्यालयातील सुचना फलक

जा.क्र/निविदा शाखा/ई. नि.सु. क्र.16/सन 2025-26/321/2026 दिनांक :- 11/02/2026

**( सु.गु. जाधव )**
**जिल्हा जलसंधारण अधिकारी,**
**मृद व जलसंधारण विभाग**
**अमरावती**

**जाहिरात क्र. १९३**


# लाल दिव्याच्या गाडीतून नाही, तर बाईकवरुन घेणार शहर समस्यांचा आढावा

## महापौर श्रीचंद तेजवाणी यांची 'महासागर' ला विशेष मुलाकत

*मनिष जगताप*

***अमरावती,( दि.13 )** – जनतेने माझ्या विश्वास ठेवत मला नगरसेवक केले, वरिष्ठांनी विश्वास ठेवत मला महापौर केले. त्यांच्या या विश्वासावर शंभर टक्के खरे उतरणे माझे प्रथम कर्तव्य आहे. त्यामूळे शहर समस्यांचा आढावा हा, महापौरांना मिळणाऱ्या लालदिव्याच्या गाडीतून न घेता चक्क बाईकवरुन फिरुन घेणार असल्याचे आश्वासन जनतेला महापौर श्रीचंद तेजवाणी यांनी दैनिक महासागर ला दिलेल्या विशेष मुलाखती दरम्यान दिले.*



### तुम्ही मागील प्रशासनावर टीका केली आहे, त्याबद्दल आपले विचार काय आहेत?

**तेजवाणी**- होय, मागील प्रशासनाने स्वच्छतेच्या बाबतीत केवळ कागदावर काम केले. प्रत्यक्षात स्वच्छतेची स्थिती सुधारली नव्हती. स्वच्छता ठेकेदारांचे बिल पूर्णपणे काढले गेले, परंतु शहरातील परिस्थिती सुधारली नाही. मी शासन व प्रशासनाला एकत्र येऊन ही परिस्थिती सुधरवित कामचुकार ठेकेदारांचे बिल थांबवण्याचे सूचित केले आहे.

### दौऱ्याचे उद्दिष्ट काय आहे?

**तेजवाणी** – स्वच्छता निरीक्षक, अधिकारी आणि संबंधित कर्मचाऱ्यांची जबाबदारी ठरवणे हे माझे मुख्य उद्दिष्ट आहे. जर ते आपल्या कामात कमी पडले, तर मी त्यांना घरी पाठवणार हे नक्की. तसेच, अधिकारी व कर्मचाऱ्यांना मी एक कडक संदेश देणार आहे की ते जनतेसाठी काम करत आहेत आणि त्यांना आपल्या कर्तव्याची जाणीव ठेवावी लागेल.

### भविष्याबद्दल आपली योजना काय आहे?

**तेजवाणी**- मी प्रत्येक प्रभागाची तपासणी करून संबंधित अधिकाऱ्यांना योग्य निर्देश देईन, आणि शहराच्या स्वच्छतेची स्थिती हळूहळू सुधारण्याचे लक्ष्य ठेवणार आहे. माझ्या या पुढाकाराने अमरावती शहर एक स्वच्छ, सुंदर आणि आरोग्यदायी ठिकाण बनेल, असा माझा विश्वास आहे.

### स्वच्छतेसाठी नागरिकांना काय संदेश देऊ इच्छिता?

**तेजवाणी**- शहराच्या स्वच्छतेसाठी नागरिकांचा सहभाग अत्यंत महत्त्वाचा आहे. माझा प्रयत्न आहे की अमरावती स्वच्छ आणि सुंदर व्हावी, परंतु हे शक्य होणार नाहीत जोपर्यंत नागरिकांचे सहकार्य लाभत नाही. जर कोणाला अडचण असेल, तर ते थेट माझ्याशी संपर्क साधू शकतात.

### महापौर म्हणून आपल्या आगामी कार्याची दिशा काय आहे?

**तेजवाणी** – माझ्या महापौरपदाच्या कार्यकाळात, स्वच्छतेवर माझा प्रामुख्याने लक्ष असेल. 16 फेब्रुवारीपासून मी प्रत्येक प्रभागात सकाळी 8 ते 10 वाजेपर्यंत मोटरसायकलवरून दौरा करणार आहे. यामध्ये मी स्वच्छतेला प्राधान्य देणार आहे. प्रभागांमध्ये जाऊन स्वच्छतेच्या परिस्थितीचा आढावा घेईन आणि नगरसेवकांसोबत त्या ठिकाणी दौरा करणार आहे.

## पाणीटंचाई व दुष्काळ या ज्वलंत समस्येवर
# सरकार संवेदनशील हवे

जगातील अनेक देशात वादळे व पाणीटंचाईची समस्या दिवसेंदिवस वाढत चालली आहे. पहिली समस्या ही निसर्गनिर्मित आहे, तर दुसरी समस्या मानवनिर्मित आहे. आपल्या देशातही दरवर्षी वादळे, पाणीटंचाई व दुष्काळ हा कायमच आपल्या पाचवीला पूजला आहे. अनेक राज्यातील जनतेची दरवर्षी पाण्यासाठी वणवण होत असते. आपल्या राज्याच्या सर्व धरणातील पाण्याचा साठा हा मार्च अखेर निम्म्यापेक्षा खाली येत असतो. यंदाचा उन्हाळा हा ग्रामीण भागातील जनतेसाठी तापदायक ठरणारा आहे.

--------------------








दीपक मोहिते
पालघर.
९०११०५५४१३
९५४५८००६६६

राज्यात एकूण ३ हजार लहानमोठी धरणे आहेत, या धरणामध्ये सरासरी ४२.३३ % पाणीसाठा आहे. गेल्या वर्षी हा साठा ५६ % इतका होता. मराठवाड्याच्या जायकवाडी धरणातील पाणीसाठा २७ % वर आल्यामुळे मार्च, एप्रिल व पुढचा मे, असे तीन महिने मराठवाडावासियावर तीव्र पाणीटंचाईचे अस्मानी संकट कोसळणार आहे. मात्र आपले सरकार या दुष्काळाचा सामना करण्यासंदर्भात फारसे संवेदनशील नसल्याचे दिसून आले आहे. फेब्रु. महिन्यातच राज्याच्या अनेक गावांतून टँकर सुरू करण्याची मागणी होत आहे. अनेक जिल्ह्यात हजारो टँकरद्वारे गावांना पाणी द्यावे लागणार आहे.

गेल्या वर्षी पावसाचे प्रमाण बऱ्यापैकी राहिल्यामुळे यंदा एप्रिल महिना सूरू होईपर्यंत दुष्काळाची तीव्रता कमीप्रमाणात जाणवू लागणार आहे. त्याचा परिणाम धरणातील पाणीसाठ्यावर होणार आहे. यंदा पावसाचे प्रमाण बऱ्यापैकी राहिल्यामुळे धरणाच्या पाण्याच्या पातळीत थोडीफार वाढ होऊ शकली .

१९९७- ९८ च्या दरम्यान पावसाचे प्रमाण सतत कमी होत गेले. पाऊस उतरणीला लागणे,म्हणजे दुष्काळाला आमंत्रण देणे, होय. त्याचा गेली २५ वर्षे आपण अनुभव घेत आहोत. एल निनोचा हा परिणाम असल्याचे पर्यावरण तज्ञांचे म्हणणे आहे. प्रशांत महासागराच्या पूर्व भागातील पाण्याचे तापमान थंड होते, तेंव्हा पश्चिम भागात हवेचा दाब कमी होतो. त्याचा परिणाम पावसावर होतो व पाऊस सरासरी २३ ते २७ % ने कमी पडतो.

यंदा जून व जुलैमध्ये पावसाचे प्रमाण कमी राहण्याची शक्यता आहे. पण सध्या म्हणजे मार्च, एप्रिल व मे या तीन महिन्यात निर्माण होणारी पाणीटंचाई व त्यातून निर्माण होणारा दुष्काळ, यावर सरकार कसा तोडगा काढणार? याविषयी अद्याप सरकारी पातळीवर कोणतीही हालचाल होत नसल्याचे दिसून आले आहे.

सरकारपुढे केवळ टँकरने पाणीपुरवठा करण्याचा एकमेव पर्याय उपलब्ध आहे. सरकार हा उपाय दरवर्षी करत असते, पण ही तात्पुरती मलमपट्टी असते. अमेरिका, ऑस्ट्रेलिया, जपान, चीन, रशिया व अन्य प्रगत राष्ट्रांनी हवामानात होणारे बदल व ग्लोबल वॉर्मिंग, या ज्वलंत विषयावर संशोधन करून उपाययोजना करण्यास सुरुवात केली आहे. पण आपल्या देशात मात्र या ज्वलंत विषयी आपले सरकार निद्रावस्थेत आहे.

भूगर्भातील पाण्याची पातळी खालावणे, धरणातील पाण्याचे साठे संपुष्टात येणे,याविषयी आपण फारसे संवेदनशील नाही. त्यामुळे दरवर्षी लाखो गावे दुष्काळाच्या कचाट्यात सापडत असतात. भूगर्भातील पाण्याचा होत असलेला अविरत उपसा रोखण्याची इच्छाशक्तीही आपल्या सरकारकडे नाही. धरणे, विहिरी, तलाव, यामधील पाण्याचे स्त्रोत आटत गेल्यामुळे दरवर्षी उन्हाळ्यात पाण्याची पातळी खाली जात आहे.

दुष्काळाच्या झळा शहरी भागापेक्षा ग्रामीण भागाला मोठ्याप्रमाणात सहन कराव्या लागतात. ग्रामीण भागातील जनतेला नद्या, तलाव, विहिरी, तलाव व बंधारे याव्यतिरिक्त पाऊस व भूगभार्तील पाण्याचे स्त्रोत, एवढाच त्यांना आधार असतो. नद्यांचे पाणी शहरी भागाला दिले जात असल्यामुळे ग्रामस्थांना गावातील विहिरी व तलाव असे दोनच पर्याय उपलब्ध असतात.

दुष्काळावर मात करण्यासाठी सरकारने गावागावात छोटी धरणे बांधली असती तर ग्रामीण भागातील जनतेला दिलासा मिळाला असता. पण आपले पाणीपुरवठा व जलसंधारण मंत्रालय कशा पद्धतीने कारभार करत असते, याचा अनुभव आपण सर्वांनीच घेतला आहे.

ग्रामीण भागातील जमिनी सिंचनाखाली आणण्यासाठी गेल्या ८ दशकात किती प्रयत्न झाले? याचा शोध घेतला तर आर्थिक निधी मोठ्याप्रमाणात खर्च झाला, पण सिंचनासाठी शेतकऱ्यांना पाणी मिळू शकले नाही. राज्यसरकारच्या निष्क्रियतेमुळे आज ग्रामीण भागातील महिलाना दरवर्षी उन्हाळ्यात हालअपेष्टा सहन कराव्या लागतात.

पाण्याची गरज, उपलब्धता व नियोजनबद्ध वापर, या तीन महत्वाच्या विषयावर सरकारने काम करायला हवे होते, पण सरकारकडून ते झाले नाही. दुष्काळाचा थेट संबंध पर्यावरणाशी असून दुष्काळाची नेमकी कारणे काय आहेत, शोधायला हवीत. अनेक एनजीओ पर्यावरण विषय हाताळत असतात, पण दुष्काळ का निर्माण होतो व त्याचा पर्यावरणाशी कसा संबंध आहे, यावर ते संशोधन करत नाहीत.

याविषयी गेल्या काही वर्षात फारसे काही झाले नाही, त्यामुळे मराठवाडा, सोलापूर, पुणे, लातूर, बीड, भागात दरवर्षी दुष्काळ निर्माण होत असतो. या सर्व भागात फेब्रु. अखेरीस टँकरने पाणीपुरवठा करण्यास सुरुवात होत असते. पण दरवर्षी निर्माण होणाऱ्या दुष्काळावर कायमस्वरूपी उपाययोजना करण्यासंदर्भात राज्यकर्ते व अधिकारी तयार नाहीत.

दिवंगत मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण, वसंतराव नाईक, वसंतदादा पाटील व शरद पवार यांनी आपल्या कार्यकाळात यावर उपाययोजना करण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न केला होता, पण त्याकाळी निधीची कमतरता व अधिकाऱ्यांची बुरसटलेली मानसिकता, इ. कारणामुळे त्यांना ते शक्य झाले नाही. मात्र आज परिस्थितीमध्ये अमूलाग्र बदल झाला आहे, सरकारकडे निधीची कमतरता नाही, पण राज्यकर्ते व सनदी अधिकाऱ्यांकडे इच्छाशक्तीचा अभाव असल्यामुळे राज्याचा ग्रामीण भाग हा दुष्काळाच्या आगीत होरपळत आहे.

त्यावेळच्या राज्यकर्त्यांमध्ये दूरदृष्टी होती, पण निधी नसल्यामुळे त्यांना खूप काही करता आले नाही. दुष्काळावर कायमस्वरूपी नियोजन करण्याची गरज आहे, त्यासाठी " पाणी अडवा, पाणी जिरवा," जलयुक्त शिवार," जलजीवन मिशन," अशा उपयुक्त योजनांची केवळ कागदावर अंमलबजावणी करुन ते कदापी शक्य होणार नाही.

राज्याच्या सर्व धरणात सरासरी ४४ % पाण्याचा साठा आहे. पाण्याची प्रचंड मागणी, कडक उन्हामुळे होणारे बाष्पीभवन, भूगर्भातील पाण्याचा होणारा अविरत उपसा, वृक्षांची बेसुमार कत्तल, मानवाची ओरबाडून खाणारी मानसिकता व वातावरणातील धोकादायक बदल, इ. विषयी सरकारने तज्ञमंडळींकडून संशोधन करून मग कृती आराखडा अमलात आणण्याची गरज आहे. पण सरकार त्यादृष्टीने काहीही करायला तयार नाही. त्यामुळे येणारा काळ आपल्यावर विविध प्रकारची संकटे लादणारा ठरणार आहे.

तामिळनाडू व कर्नाटक राज्याच्या चेन्नई व बेंगळुरू शहरात आज नागरिकांची पाण्यासाठी दाही दिशा भटकंती सुरू झाली आहे. कालांतराने हीच परिस्थिती आपल्या राज्याच्या अनेक महानगरे व ग्रामीण भागात निर्माण होण्याची शक्यता आहे.

दक्षिण आफ्रिकेच्या केपटाऊन, या शहरातील पाणीसंकट, हे जगभरातील सर्व देशासाठी एकप्रकारचा" अलर्ट," असून त्यातून बोध घेऊन आपण आपल्या वागण्यात बदल करायला हवा. निसगार्चे लचके तोडणे व संसाधनांची लूट करणे, निदान आता तरी थांबवायला हवे, अन्यथा जगभरातील देशांच्या वसुंधरेचा विनाश अटळ आहे.

# १४ फेब्रुवारी भारतीयांसाठी 'काळा दिवस'

आतंकवाद हा आजमितीला साऱ्या जगाची डोकेदुखी बनला आहे. स्वातंत्र्यानंतर आजतागायत भारतावर अनेक दहशतवादी हल्ले झाले ज्यामध्ये सहस्त्रो निरपराध नागरिकांसह, कितीतरी पोलीस आणि सैन्य अधिकारी मारले गेले.

१४ मार्च २०१९ या दिवशी पुलवामा येथे झालेला आतंकवादी हल्ला हा सुद्धा त्यापैकीच एक होता. भारतीय तरुण व्हॅलेंटाईन डेच्या गुलाबी वातावरणात रंगलेले असताना जम्मू काश्मीरच्या एका भागात देशासाठी कर्तव्य निभावताना देशाचे ४० तरुण सैनिक शहीद झाले तर शेकडो जण घायाळ झाले.

या हल्याने अनेक कुटुंब उध्वस्त झाली. शहिद झालेल्या जवानांना समर्पित आणि या हल्याचा निषेध म्हणून भारत सरकारने १४ फेब्रुवारी हा दिवस यापुढे 'काळा दिवस' म्हणून पाळण्याची घोषणा केली.

पुलवामा येथे या दिवशी दुपारी ३.१५ वाजता सीआरपीएफ जवानांचा एक ताफा जम्मू काश्मीर महामार्गावरून जम्मूहून श्रीनगरला चालला होता. या ताफ्यात ७८ वाहने आणि सुमारे २५०० सैनिकांची तुकडी होती. अवंतिपुराजवळील लेथपोरा येथे ताफा पोहोचताच स्फोटकांनी भरलेली एक कार ताफ्यातील एका बसला धडकली. ज्यामुळे प्रचंड मोठा स्फोट झाला.



जगन घाणेकर
घाटकोपर, मुंबई.
९६६४५५९७८०

आदिल अहमद दार नावाचा २० वर्षाचा जैश ए मोहम्मद या आतंकवादी संघटनेचा तरुण ही कार चालवत होता. या स्फोटाची तीव्रता इतकी भयंकर होती कि ज्या बसवर ती धडकली त्या बसचे रूपांतर क्षणार्धात धातूच्या ढिगाऱ्यामध्ये झाले. आजूबाजूच्या वाहनांना आगी लागल्या.

जैश-ए-मोहम्मद या आतंकवादी संघटनेने या हल्ल्याचे दायित्व स्वीकारले. आदिल अहमद दारचा त्यांनी एक व्हिडीओ प्रसारित केला ज्यामध्ये तो स्वतःला फिदायिन म्हणवून घेत आहे. या हल्ल्यानंतर देशभर संतापाची लाट पसरली. आतंकवादी आणि त्यांच्या समर्थकांवर यापुढे कोणतीही कारवाई करण्याचे स्वातंत्र्य देशाचे पंतप्रधान नरेंद मोदी यांनी या हल्ल्यानंतर सुरक्षा दलांना दिले.

जगभरात आजतागायत जे आतंकवादी हल्ले झाले त्यातील सर्वात घातक हल्यांपैकी एक असा पुलवामा हल्याचा उल्लेख केला जातो. यंदाच्या १४ फेब्रुवारीला या घटनेला ७ वर्षे पूर्ण होत आहेत. तेव्हापासुन दरवर्षी हा दिवस हा देशभरात 'काळा दिवस' म्हणून पाळला जातो. आजमितीला किती तरुणांना या दिवसाविषयी माहित आहे.

जगातील अनेक देशांत १४ फेब्रुवारीला साजरा केला जाणारा 'व्हॅलेंटाईन डे' हा काही भारतीय सण नाही. तरीही तो देशभरात उत्साहाने साजरा केला जातो. तरुणांमध्ये या दिवसाची अधिक क्रेझ असते. या दिवसाला अधिक रोमँटिक करण्यासाठी वृत्तवाहिन्या, विविध चॅनल्सवर चालणारे डेलीसोप, बॉलिवूड कलाकार आणि त्यानिमित्ताने आपला व्यवसाय चालवणाऱ्या कंपन्या त्यामध्ये भर घालत असतात. भारतात या दिवशी प्रेमाच्या नावाखाली स्वैराचारच अधिक चालत असल्याचे मागील काही वर्षांतील घटनांवरून लक्षात आले आहे.

या दिवशी गर्भनिरोधक साधनांची मोठ्या प्रमाणात विक्री होते. हॉटेल्स, लॉज या दिवशी गजबजलेले असतात, यावरून प्रेमाच्या नावाखाली आपल्याकडे काय चालते हे लक्षात येईल. प्रेमाला आजतागायत भारतीय संस्कृतीने कधीच विरोध केलेला नाही.

जगाच्या पाठीवरील निरपेक्ष आणि निस्सीम प्रेमाचे सर्वोत्तम उदाहरण द्यायचे झाल्यास भगवान श्रीकृष्ण आणि राधाराणी यांच्या नात्याचा उल्लेख करावा लागेल. प्रेम म्हणजे काय हे जाणून घ्यायचे आहे त्याने एकदा तरी भागवत वाचावे. प्रेमाच्या नावाखाली या दिवशी चालणारा बाजार कित्येक मुलींचे आयुष्य उध्वस्त करतो.

व्हेलेंटाईन डे नंतर पुढील २-३ महिन्यांत गर्भपात करून घेणाऱ्या अविवाहित मुलींचे प्रमाण कमालीचे वाढलेले असते. भारतीय संस्कृतीला न शोभणाऱ्या या दिवसाचे भारतात एव्हढे स्तोम कशासाठी? १४ फेब्रुवारी या दिवशीचे भारताच्या दृष्टीने काय महत्व आहे हे आजच्या महाविद्यालयीन तरुणांना विचारल्यास ९५ टक्के मुले या दिवशी व्हॅलेंटाईन डे असतो हेच उत्तर देतील, कारण आपले देशाप्रतीचे प्रेम केवळ स्वातंत्र्य दिन आणि प्रजासत्ताक दिन या वर्षातील दोन दिवशीच जागृत झालेले असते.

तळपते ऊन, मुसळधार पाऊस आणि कडाक्याच्या थंडीतही समस्त भारतीयांच्या रक्षणासाठी सीमेवर अहोरात्र पहारा देणाऱ्या सैनिकांप्रती आपल्या प्रत्येकांत सद्भावना केव्हा जागृत होणार? त्यांच्या त्यागाचे आणि बलिदानाचे मोल आपल्याला केव्हा कळणार?

■ ■ ■

# रेडिओ मनोरंजनाचे सर्वात जुने माध्यम

■ कृष्णकुमार आनंदी
गोविंदा निकोडे
गडचिरोली.
7775041086

(कालच्या अंकावरून पुढे)

--------------------

जगातला पहिला रोडिओ इटलीचे शास्त्रज्ञ माकोर्नी यांनी बनवला. सन १८९५मध्ये त्यांनी रेडिओचा शोध लावला आणि त्याचे पेटंटही मिळवले. मार्कोनीला फादर ऑफ रेडिओ असेही म्हणतात. इंग्रजांनी आणि अनेक युरोपीयन देशांनी हे तंत्रज्ञान आपापल्या वसाहतीत नेले.

याच माध्यमातून अमेरिका, आफ्रिका, आशिया खंड आणि ऑस्ट्रेलिया असा रेडिओचा प्रसार झाला. त्या काळी हे माध्यम प्रामुख्याने कम्युनिकेशनसाठी वापरले जात होते. विशेषतः युद्धकाळात बातम्या लोकांपर्यंत पोहोचवण्यासाठी, अनेक खेळांच्या कॉमेंट्रीसाठी रेडिओचा वापर होऊ लागला.

स्वातंत्र्यपूर्व काळात भारतातही ब्रिटिशांनीच रेडिओ आणाला. २३ जुलै १९२७ रोजी मुंबई आणि कलकत्ता येथे ऑल इंडिया रेडिओ नावाची दोन केंद्रे सुरू झाली. त्यानंतर सन १९३२मध्ये भारत सरकारने भारतीय प्रसारण सेवा नावाचा एक विभाग सुरू केला.

१९३६ मध्ये त्याचे नाव ऑल इंडिया रेडिओ- एआईआर असे ठेवण्यात आले. दरम्यान, सन १९२०चे दशक येता येता रेडिओला व्यावसायिक स्वरुप प्राप्त झाले. तसेच सन १९५० पर्यंत रेडिओ लोकप्रिय झाला होता. भारतातही रेडिओची सुरुवात सन १९२० च्या दशकात झाली.

२३ जुलै १९२७ रोजी मुंबईतून रेडिओ प्रसारण सेवा सुरू झाली. तसेच इंडियन ब्रॉडकास्टींग कंपनी लिमिटेडने मुंबई आणि कोलकता येथे रेडिओ स्टेशन सुरू केले. परंतु सन १९३० मध्ये ही कंपनी बंद पडली. त्यानंतर सरकारने ही कंपनी आपल्या ताब्यात घेत त्याला इंडियन स्टेट ब्रॉडकास्टींग सर्विस असे नाव दिले.

८ जून सन १९३६मध्ये त्यांचे ऑल इंडीया रेडीओ असे नामकरण करण्यात आले. तसेच सन १९५६ मध्ये पुन्हा याचे नाव बदलत आकाशवाणी करण्यात आले. हळूहळू आकाशवाणीचे जाळे देशभर पसरू लागले.

आज २३ भाषांमध्ये ४१५ रेडिओ स्टेशनसह ऑल इंडीया रेडीओ ही जगातल्या सर्वात मोठ्या रेडिओ प्रसारण सेवेपैकी एक बनली आहे. तसेच सन २००१मध्ये भारतात खासगी रेडिओ स्टेशनलासुद्धा सुरुवात झाली होती.

रेडिओ हे सर्वात जुने माध्यम असले तरी, संवादाचे एक महत्त्वाचे माध्यम म्हणून त्याच्याकडे बघितले जाते. सन १९४५मध्ये आजच्याच दिवशी संयुक्त राष्ट्र संघात रेडिओचे पहिले प्रसारण झाले होते. त्यामुळे हा दिवस 'जागतिक रेडिओ दिवस' म्हणून साजरा केला जातो.

स्पेन रेडिओ अकादमीने २०१० मध्ये 'जागतिक रेडिओ दिवस' साजरा करण्यासंदर्भात प्रस्ताव सादर केला होता. त्यानंतर युनेस्कोच्या ६७ व्या सत्रात १३ फेब्रुवारी हा दिवस 'जागतिक रेडिओ दिवस' म्हणून घोषित करण्यात आला. युनेस्कोच्या या निर्णयाला संयुक्त राष्ट्रसंघाने १४ जानेवारी २०१३ रोजी मान्यता दिली.

दरवर्षी युनेस्कोद्वारे जगभरातील रेडिओ प्रसारक आणि संघटनांनाच्या मदतीने विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते. तसेच संवादाचे माध्यम म्हणून रेडिओच्या भूमिकेवरसुद्धा चर्चा केली जाते.

यावर्षी जागतिक रेडिओ दिवसाला 'रेडिओ आणि विविधता' ही थीम देण्यात आली आहे. तसेच विकास, नाविन्यपूर्ण उपक्रम आणि संपर्क असे सबथीम सुद्धा देण्यात आले आहे.

■ ■ ■

# सौंदर्याची खाण, बॉलिवूडची शान : मधुबाला





आज १४ फेब्रुवारी, बॉलिवूडची मर्लिन मनरो, सौंदर्याची खाण, बॉलिवूडची शान, चित्रपट सृष्टीतीलच नव्हे तर भारतातील सर्वात सुंदर महिला असे जीचे वर्णन केले जाते त्या मधुबाला यांचा आज जन्मदिन. आज त्यांची ९३ वि जयंती.

१४ फेब्रुवारी १९३३ रोजी दिल्लीच्या एका पश्तून कुटुंबात जन्मलेल्या मधुबाला यांचे मूळ नाव मुमताज बेगम जहाँ देहलवी. असे म्हणतात की मधुबाला यांच्या जन्मानंतर एका व्यक्तीने तिच्या बाबत असे भविष्य वर्तवले होते की ती तिच्या आयुष्यात खूप ख्याती मिळवेल. पैसा अडका, धन संपत्ती मिळवेल पण तिचे आयुष्य अतिशय दुःखी असेल.

या भविष्यावर विश्वास ठेवून तिचे वडील तिला मुंबईला घेऊन आले. वयाच्या नवव्या वर्षी म्हणजे १९४२ साली मधुबाला यांनी बेबी मुमताज या नावाने चित्रपटात भूमिका करण्यास सुरुवात केली. बाबुराव पटेल आणि डॉ सुशीलाराणी पटेल या दाम्पत्याचा मधुबाला वर विशेष लोभ होता त्यांनीच तिला मधुबाला हे नाव दिले.

बालवयातच चित्रपटात काम करू लागल्याने मधुबाला या शाळेत जाऊ शकल्या नाहीत त्यामुळे त्यांना इंग्रजी येत नसे मात्र उर्दू भाषा येत होती. चित्रपटात भूमिका करण्यास सुरवात केल्यावर मात्र तिने इंग्रजीवर चांगले प्रभुत्व मिळवले. तिचे वडील कडक शिस्तीचे असल्याने ती चित्रपटाच्या प्रीमियरला उपस्थित राहत नसे.

१९४७ साली आलेल्या निलकमल या चित्रपटात ती पहिल्यांदा अभिनेत्री म्हणून झळकली. याच वर्षी तिचा आणखी एक चित्रपट रिलीज झाला. पुढच्या वर्षी म्हणजे १९४८ साली तिचा अमर प्रेम नावाचा चित्रपट आला या सर्व चित्रपटात राज कपूर हे तिचे नायक होते. यानंतर बॉम्बे टॉकीजचा महल नावाचा चित्रपट आला हा चित्रपट सुपर डुपर हिट ठरला.

यानंतर मात्र मधुबाला यांनी मागे वळून पाहिले नाही. अशोक कुमार, दिलीपकुमार, देवानंद या त्या काळातील आघाडीच्या अभिनेत्यांसह तिने भूमिका केल्या. अल्पावधीतच त्या बॉलिवूडच्या आघाडीच्या अभिनेत्री बनल्या. त्यांनी आपल्या करियरमध्ये ६६ चित्रपटात भूमिका केल्या. बॉलिवूडचे पहिले सुपरस्टार दिलीपकुमार यांच्यावर त्या एकतर्फी प्रेम करत असत.

मुघले आझम चित्रपटाच्या शूटिंगच्या दरम्यान त्यांनी दिलीपकुमार यांच्याशी लग्न करण्याची इच्छा बोलून दाखवली मात्र दिलीपकुमार यांनी लग्नास स्पष्ट नकार दिला. त्यानंतर त्यांनी गायक किशोरकुमार यांच्याशी विवाह केला. मधुबाला या किशोरकुमार यांच्या चौथ्या पत्नी होत्या. किशोरकुमार यांच्या बरोबरचे लग्न ही बाब दोघांसाठी कसेतरी जगण्यासाठी केलेली तडजोड होती. दोघांचे जास्त पटत नसे.

मधुबाला यांना हृदय रोग होता आणि १९५० पासून त्यांच्यावर उपचार चालू होते. पण तिने ही गोष्ट सर्वांपासून लपवून ठेवली होती. तिची तब्येत बरी नसतानाही त्यांनी निर्माते दिग्दर्शकांचे नुकसान होऊ नये म्हणून साइन केलेले चित्रपट पूर्ण केले. या चित्रपटात असे कोठेही जाणवत नव्हते की त्या आजारी आहेत. हृदय रोगासोबत त्यांना असा एक आजार होता की ज्या आजाराने शरीरात प्रमाणापेक्षा अधिक रक्त तयार होत असे व तिच्या नाकातून व तोंडातून रक्तस्त्राव होत असे.



श्याम ठाणेदार
दौंड. जिल्हा पुणे.
९९२२५४६२९५

इतक्या दुर्धर आजारातही तिने चित्रपटात काम करणे सुरूच ठेवले. मुघले आझम या चित्रपटातील एका दृश्यात तिला दोरखंडाने बांधले होते पण तिने तब्येत बरी नसतानाही ते सहन केले. ती म्हणायची अनारकलीची भूमिका करण्याची संधी पुन्हा मिळणार नाही. ती इतकी प्रोफेशनल होती की आपले काम अतिशय तन्मयतेने करत असत. प्रसंगी जेवण झाले नाही तरी चालेल, थर्ड क्लासने प्रवास करावा लागला तरी चालेल पण काम वेळेच्या वेळी पूर्ण करण्याचा तिचा आग्रह असे.

तिच्या याच कामाच्या निष्ठेमुळे ती महान अभिनेत्री बनली. अमेरिकेच्या थिएटर आर्टस या जगप्रसिद्ध मासिकेने तिचा जगातील सर्वात मोठी अभिनेत्री म्हणून गौरव केला होता. तिच्या सौंदयार्ची जादूच अशी होती की बघणारा हरखून जायचा. पण हेच आरस्पानी सौंदर्य तिच्यासाठी मात्र शापित ठरले.

वयाच्या अवघ्या ३६ व्या वर्षी त्यांनी जगाचा निरोप घेतला. २३ फेब्रुवारी १९६९ साली त्यांनी जगाचा निरोप घेतला. मधुबालाला व्हीनस ऑफ स्क्रीन असे म्हटले जाते मात्र तिच्या याच आरस्पानी सौंदयार्ला अल्पायुष्याचा शाप होता. आज त्या जाऊन ५७ वर्ष झाले मात्र तिच्या सौंदर्याची आणि अभिनयाची जादू आजही कायम आहे. सौंदर्याची खाण मधुबाला यांना जयंतीदिनी विनम्र अभिवादन!

■ ■ ■




शरीरात व्हिटॅमिन बी १२ ची कमतरता ही एक सामान्य समस्या बनत आहे. अन्नाच्या कमतरतेमुळे हे घडत आहे. जीवनसत्व ब १२ च्या कमतरतेमुळे अशक्तपणा, थकवा आणि एकाग्रतेचा अभाव यासारख्या समस्या उद्भवू शकतात.

याचे कारण असे आहे की व्हिटॅमिन बी १२ लाल रक्तपेशी तयार करण्यासाठी आवश्यक आहे, जे आपल्या मेंदूसह आपल्या स्नायू आणि अवयवांमध्ये ऑक्सिजन घेऊन जाते. जेव्हा व्हिटॅमिन बी १२ ची कमतरता असते तेव्हा लोक त्यासाठी औषधे घेतात किंवा इंजेक्शन घेतात, परंतु कोणत्या लोकांनी औषध खावे आणि कोणाचे काम इंजेक्शनद्वारे केले जाईल हे माहित असते.

बी १२ कॅप्सूल किंवा टॅब्लेटमध्ये 50 ते 5,000 मायक्रोग्राम पर्यंतचा डोस असतो, तर बी 12 इंजेक्शनमध्ये सामान्यतः 1,000 मायक्रोग्राम असतो.

संशोधनानुसार, शरीर व्हिटॅमिन बी 12 औषधांच्या 1,000 मायक्रोग्रॅमपैकी केवळ 1.3% शोषून घेते. दुसरीकडे, व्हिटॅमिन बी 12 इंजेक्शनच्या समान प्रमाणात शोषण दर 55% ते 97% दरम्यान असल्याचे आढळले आहे. व्हिटॅमिन बी 12 हे शरीरासाठी अत्यंत आवश्यक पाण्यात विरघळणारे जीवनसत्त्व आहे. हे विशेषतः रक्तनिर्मिती, मज्जासंस्थेचे आरोग्य आणि डीएनए निर्मितीसाठी महत्त्वाची भूमिका बजावते. शरीरात लाल रक्तपेशी तयार करण्यासाठी बी१२ आवश्यक असते.

याची कमतरता झाल्यास मेगालोब्लास्टिक ॲनिमिया होऊ शकतो, ज्यामुळे अशक्तपणा, थकवा, चक्कर येणे आणि श्वास घेण्यास त्रास अशी लक्षणे दिसू शकतात. त्यामुळे शरीरात पुरेशा प्रमाणात बी १२ असणे गरजेचे आहे. व्हिटॅमिन बी१२ मज्जासंस्थेच्या कार्यासाठीही अत्यंत महत्त्वाचे आहे. हे नसांच्या भोवती असलेल्या मायेलिन कवचाच्या निर्मितीत मदत करते, ज्यामुळे मेंदू आणि शरीरातील संदेशवहन सुरळीत होते. बी १२ ची कमतरता असल्यास हात-पाय झिणझिण्या येणे, स्मरणशक्ती कमी होणे, लक्ष केंद्रीत करण्यात अडचण येणे किंवा नैराश्याची लक्षणे दिसू शकतात.

दीर्घकाळ कमतरता राहिल्यास मज्जातंतूंना कायमस्वरूपी हानी होण्याची शक्यता असते. याशिवाय, बी १२ शरीरातील ऊर्जा निर्मितीत आणि चयापचय प्रक्रियेत (मेटाबॉलिझम) सहभाग घेते. हे अन्नातून मिळणाऱ्या पोषक घटकांचे ऊर्जेत रूपांतर करण्यास मदत करते. बी १२ प्रामुख्याने प्राणिजन्य अन्नपदार्थांमध्ये आढळते, जसे की दूध, अंडी, मासे आणि मांस. शाकाहारी व्यक्तींमध्ये याची कमतरता होण्याची शक्यता जास्त असते, त्यामुळे आवश्यक असल्यास पूरक आहार (सप्लिमेंट्स) घेणे उपयुक्त ठरते. एकूणच, रक्त, मेंदू आणि संपूर्ण शरीराच्या कार्यक्षमतेसाठी व्हिटॅमिन बी१२ अत्यंत आवश्यक आहे.

व्हिटॅमिन बी १२ इंजेक्शन्स शरीराद्वारे अधिक चांगल्या प्रकारे शोषली जातात कारण ती इंट्रामस्क्युलरली दिली जातात. व्हिटॅमिन बी १२ च्या गोळ्या पाचक मुलूखातून जावे लागतात, ज्यामुळे त्यांचे शोषण दर खूप कमी आहे. व्हिटॅमिन बी १२ च्या गोळ्या इंजेक्शनांप्रमाणे शरीरात शोषल्या जात नसल्याने त्या दररोज घेणे आवश्यक आहे.

डोस अनेकदा खूप जास्त असतो, कारण त्यातील बहुतेक पाचक मुलूखाद्वारे शरीरातून बाहेर टाकले जाते. यामुळे परिणाम हळूहळू दिसून येतील आणि लक्षणे सुधारण्यास अनेकदा थोडा वेळ लागू शकतो. औषधे 3 ते 6 महिने घ्यावी लागतात, परंतु इंजेक्शनद्वारे व्हिटॅमिन बी १२ ची पातळी लवकर वाढते.

शरीरात जीवनसत्त्व बी १२ ची कमतरतादेखील औषध किंवा इंजेक्शन पाहून घेतली पाहिजे. जर व्हिटॅमिन बी १२ ची पातळी 150 पीजी / एमएलपेक्षा कमी असेल तर आपण इंजेक्शन घेऊ शकता. जर २०० - ३०० पी.जी./एमएल असेल तर डॉक्टरच्या सल्ल्याने औषधे सुरू केली जाऊ शकतात .

## अशोकायन

प्रा. अशोक सारडा
मेहकर
(९४२१३९४३३९)



# हर हर महादेव

सकाम भक्तिचा अर्थ
आवळा देऊन
कोहळा काढणे
तो तर आहे अंर्तयामी
सर्व काही जाणे..

निष्काम भक्ति मध्येच
आहे ती अद्भूत शक्ति
जनाबाई साठी दळण दळले
नाही हो ही
अतिशयोक्ती..

मोहबंधन झुगारून
सर्व भार टाके त्यावर
त्याचा सारा भार वाहे
तो जगतस्वामी विश्वंभर...!

## वाचक लिहितात

## कपड्यांवर 'ॐ नमः शिवाय' नको!

महाशिवरात्रीच्या १५ दिवस आधीपासूनच ऑनलाईन तयार कपडे विकणाऱ्या समस्त संकेतस्थळांवर 'ॐ नमः शिवाय।' लिहिलेले शट्‌र्स, शॉर्ट आणि लॉन्ग कुर्ते, टी शर्ट निरनिराळ्या रंगांत विक्रीसाठी उपलब्ध केले जातात. महाशिवरात्री निमित्त या कपड्यांवर विशेष सवलतही दिली जाते. दुकानांमध्येही असे कपडे सर्वांना दिसतील असे दर्शनी भागात मांडले जातात. अशाच प्रकारचे दृष्य श्रावण मासातही पाहायला मिळते.

या प्रकारच्या कपड्यांना या दिवसांत प्रचंड मागणी असते. बारा ज्योतिर्लिंग तसेच भगवान शिवाची पुरातन मंदिरे ज्या ठिकाणी आहेत अशा ठिकाणी या स्वरूपाच्या कपड्यांचे स्टॉल्स पाहायला मिळतात. प्राचीन शिवमंदिराच्या ठिकाणी भरणाऱ्या जत्रांमध्ये सुद्धा 'ॐ नमः शिवाय।' मंत्रजप प्रिंट केलेले कपडे विक्रीसाठी ठेवलेले दिसून येतात, जीन्स पॅन्टवर अशा प्रकारचे सदरे घातलेले तरुण-तरुणी हल्ली सर्वत्र पाहायला मिळतात. एकीकडे आपली शिवभक्ती दाखवण्यासाठी अशा प्रकारचे कपडे घालायचे आणि दुसरीकडे प्रत्यक्ष शिवाचाच अवमान करायचा अशाने शिवाची कृपा आपल्यावर होईल का? भक्ती ही मनापासून करावी, त्यासाठी हिंदू धर्मात अनेक मार्ग सांगण्यात आले आहेत. अशा प्रकारे मंत्रजपाचे कपडे परिधान करून आपल्या भक्तीचा देखावा करू नये. भगवान शिवाचा मंत्रजप प्रिंट केलेले कपडे विकत घेणे आणि ते परिधान टाळायला हवे.

■ सौ. मोक्षदा घाणेकर, मुंबई.

# अमरावती-परतवाडा मार्गावर खासगी बसचा बेकायदा सुळसुळाट

## प्रशासन मूकदर्शक

**महासागर प्रतिनिधी**
**चांदूर बाजार,( दि.13 )** - अमरावती-परतवाडा, परतवाडा-मोर्शी तसेच पांढूर्णा मार्गांवर खासगी बस चालक व मालकांकडून प्रवाशांच्या सुरक्षिततेशी खेळ सुरू असल्याचे चित्र दिवसेंदिवस गंभीर होत आहे. मर्यादेपेक्षा अधिक प्रवासी घेणे, भरधाव वेगाने वाहन चालविणे आणि वाहतूक नियमांचे उघड उल्लंघन या प्रकारांमुळे अपघातांचा धोका वाढत असल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे. विशेष म्हणजे, वारंवार तक्रारी करूनही प्रादेशिक परिवहन विभागाकडून ठोस कारवाई होत नसल्याची नाराजी व्यक्त होत आहे.



Hsrp नंबर प्लेट तसेच प्रवाश्यांनी गच्च भरलेली खाजगी बस.

नागरिकांच्या मते, संबंधित पथके पेट्रोलिंगदरम्यान शाळा बस किंवा लहान लोडिंग वाहनांवर कारवाई करताना दिसतात; मात्र गौण खनिज वाहतूक व खासगी बसवरील उल्लंघनांकडे दुर्लक्ष होत असल्याचे दिसून येते. क्षमतेपेक्षा जास्त प्रवासी कोंबून धावणाऱ्या बसेसमुळे अपघातांची शक्यता वाढते. 2024 मधील अपघात तसेच शिरजगाव कसबा आणि घाटलाडकी परिसरातील खासगी बस अपघातांमधूनही प्रशासनाने धडा घेतलेला दिसत नाही, अशी टीका स्थानिकांकडून केली जात आहे.


खाजगी बसच्या कॅबिन मध्ये बसलेले प्रवासी

नियमांचे उघड उल्लंघन करणाऱ्या खासगी बसवर तात्काळ आणि कठोर कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे. अन्यथा मोठी दुर्घटना घडल्याशिवाय प्रशासन जागे होणार नाही, अशी भीती व्यक्त होत आहे. आता प्रशासन कोणती ठोस भूमिका घेणार आणि कारवाईची माहिती सार्वजनिक करणार का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. जर खासगी बसांना नियमांची अलिखित सूट असेल, तर तीच सूट शेतकऱ्यांनाही का देऊ नये? असा संतप्त सवाल नागरिक उपस्थित करत आहेत. स्थानिकांच्या मते, या मार्गावरील अपघातांमध्ये खासगी बसांचा मोठा वाटा असूनही परवाने रद्द करणे, दंडात्मक कारवाई करणे किंवा नियमित तपासणी यासारख्या उपाययोजना प्रभावीपणे दिसून येत नाहीत.

### ‘नो पार्किंग’क्षेत्रात घुसखोरी

अमरावती-परतवाडा, परतवाडा-धारणी, धारणी-परतवाडा, परतवाडा-पांढूर्णा आणि चांदूर बाजार-अमरावती या मार्गांवर अनेक खासगी बसेस क्षमतेपेक्षा अधिक प्रवासी घेत असल्याचे रोजचे दृश्य आहे. काही ठिकाणी प्रवाशांना केबिनमध्ये बसविणे, उभे करून प्रवास करविणे, तसेच वाहन चालविताना चालकांनी मोबाईलवर बोलणे असे प्रकार सर्रास घडत असल्याचे प्रत्यक्षदर्शी सांगतात. वाहक व चालकांना गणवेश नसणे, कर्कश हॉर्नचा वापर आणि प्रवाशांना मनमानीने कोणत्याही ठिकाणी उतरविणे यामुळे वाहतुकीची शिस्त धोक्यात आली आहे. अमरावती बस स्थानकाबाहेरील 200 मीटर परिसर ‘नो पार्किंग’ घोषित असतानाही काही खासगी बसेस तेथे उभ्या राहून प्रवासी गोळा करतात. मात्र यावर अमरावती शहर पोलीस किंवा प्रादेशिक परिवहन विभागाकडून कारवाई होत नसल्याची खंत व्यक्त होत आहे.

# बांधकाम कामगारांना साहित्य किटचे आता तालुकानिहाय होणार वितरण

## गर्दी टाळण्याचे प्रशासनाचे आवाहन

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती, ( दि. 13 )** - महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळांतर्गत नोंदणीकृत बांधकाम कामगारांना देण्यात येणाऱ्या विविध साहित्य संचांचे वाटप 13 फेब्रुवारी 2026 पासून तात्पुरते स्थगित करण्यात आले आहे. वाटप केंद्रांवर होणारी प्रचंड गर्दी आणि संभाव्य कायदा व सुव्यवस्थेची परिस्थिती लक्षात घेता, जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांच्या आदेशानुसार आता साहित्याचे वितरण तालुकानिहाय करण्यात येणार असल्याची माहिती कामगार उप आयुक्त कार्यालयामार्फत देण्यात आली आहे.



मंडळामार्फत गृहपयोगी वस्तू संच, सुरक्षा संच आणि अत्यावश्यक संच यांचे वाटप करण्यात येते. वाटप सुरळीत पार पडावे यासाठी संकेतस्थळावर नोंदणी करून वेळ दिली जाते. मात्र, 13 ते 27 फेब्रुवारी या कालावधीत संच मिळण्यासाठी नोंदणी केलेल्या कामगारांची मोठ्या प्रमाणात उपस्थिती होत असल्याने अनेक ठिकाणी गर्दी व गोंधळाची परिस्थिती निर्माण होत आहे. ही बाब गंभीर स्वरूपाची असल्याचे लक्षात घेऊन जिल्हाधिकारी श्री. येरेकर यांनी सध्याचे वाटप तात्काळ बंद करण्याचे आदेश दिले आहेत. तसेच, प्रत्येक नोंदणीकृत कामगाराला त्यांच्या संबंधित तालुक्याच्या ठिकाणी दररोज जास्तीत-जास्त 500 संचांचे वितरण करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

तालुकानिहाय वितरणाच्या तारखा संबंधित कंत्राटदारामार्फत कामगारांना स्वतंत्रपणे कळविण्यात येणार आहेत. तोपर्यंत कामगारांनी वाटप केंद्रांवर गर्दी करू नये आणि मंडळास सहकार्य करावे, असे आवाहन कामगार उप आयुक्त, अमरावती विभाग यांनी केले आहे.

# पार्डी (देवी) रेल्वे क्रॉसिंगवर आरओबी बांधणीस मंजूरात

**महासागर प्रतिनिधी**
**अंजनगाव बारी, ( दि.13 )**- बडनेरा मतदारसंघातील पार्डी (देवी) गावातील नागपूर-मुंबई रेल्वे मार्गावरील क्रॉसिंगवर आरओबी (रेल्वे ओव्हर ब्रिज) बांधणीस मंजुरी मिळाली आहे. सध्याचे अंडरब्रिज खूपच लहान आणि अरुंद असल्यामुळे मोठ्या वाहनांना तेथून जाण्यात अडचण येत आहे.



या भागातील शेतकऱ्यांना शेतीसाठी आवश्यक उपकरणे, ट्रॅक्टर, कापणी यंत्रे आणि थ्रेशर वाहतूक करताना अडचणी येत आहेत. पार्डी (देवी) गाव राज्य महामार्ग-199 जवळ असल्याने प्रस्तावित आरओबी बांधणी वाहतुकीस सुगम करेल. खासदार बळवंत वानखडे यांच्या प्रयत्नांनंतर नागपूर मध्य रेल्वे प्रबंधकांना निवेदन देऊन आरओबी बांधणीसंदर्भातील तातडीची कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे. पुल बांधल्यास ट्रॅफिक जाम कमी होईल, अपघातांचा धोका कमी होईल आणि मोठ्या वाहनांसाठी मार्ग सोपा होईल, असे निवेदनात नमूद आहे. आरओबी म्हणजे रेल्वे ट्रॅकच्या वरून जाणारे पूल. जमीन संपादन, पर्यावरणीय मंजुरी आणि रेल्वे-राज्य समन्वय यासारख्या अडचणी असूनही, हे पूल स्थानिक वाहतुकीसाठी आणि सुरक्षिततेसाठी अत्यंत महत्त्वाचे ठरते.

## मोबाइल हिसकाविणाऱ्या दोघांना पकडले

**अमरावती** - मॉर्निंग वॉकला जात असलेल्या एका जवळील मोबाइल हिसकावणार्या दोघांना नागरिकांनी पकडून फ्रेजरपुरा पोलिसांच्या ताब्यात दिले. ही घटना महादेवखोरी-छत्र तलाव मार्गावर मंगळवारी रोजी सकाळई घडली. शांतीनगर येथील रहिवासी निजल गवई हे महादेवखोरी-छत्री तलाव मार्गाने मॉर्निंग वॉक करीत होते. त्यावेळी दुचाकीवरून आलेल्या दोघांनी त्यांच्याजवळील मोबाइल हिसकावला. परिसरातील नागिरकांनी त्या दोघांना पकडले आणि पोलिसांच्या स्वाधीन केले.

# ग्रामपंचायतींवर सरपंचांना प्रशासक म्हणून नियुक्त करण्याची मागणी

## खा.बळवंत वानखडे यांना निवेदन

**महासागर प्रतिनिधी**
**अंजनगाव बारी, ( दि.13 )**- राज्यातील बहुसंख्य ग्रामपंचायतींचा कार्यकाळ येत्या फेब्रुवारी 2026 मध्ये संपत आहे. याबाबत सरपंच संघटनेने ग्रामपंचायतींवर प्रशासक म्हणून सरकारी कर्मचारी किंवा अधिकारी नेमण्याऐवजी विद्यमान सरपंचांना प्रशासक म्हणून नियुक्त करण्याची मागणी खासदार बळवंत वानखडे यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.



सरपंच संघटनेच्या म्हणण्यानुसार, महाराष्ट्रात फेब्रुवारीत कार्यकाळ संपलेल्या ग्रामपंचायतींवर प्रशासक नेमल्यास ग्राम विकासाची कामे व इतर सुविधा खोळंबल्या जातात आणि शासकीय योजनांची अंमलबजावणी प्रभावित होते. त्यामुळे विद्यमान सरपंचांना प्रशासक म्हणून नियुक्त करणे किंवा सद्य कार्यकारी पदाधिकाऱ्यांना निवडणूक होईपर्यंत मुदतवाढ देणे आवश्यक आहे. दि. 8 फेब्रुवारी रोजी दुपारी 1 वाजता सरपंच संघटनेच्या वतीने जिल्हाध्यक्ष गुलाम नबी इंदलेकर, विदर्भ संपर्कप्रमुख मोहन चव्हाण आणि महिला आघाडी जिल्हाप्रमुख रक्षणा सरदार यांच्या उपस्थितीत खासदार बळवंत वानखडे यांना निवेदन सादर करण्यात आले. खासदार वानखडे यांनी तत्काळ ग्रामविकास मंत्री यांच्याशी संपर्क साधून निवेदन मेलद्वारे पाठवले. यावेळी चांदूर बाजार तालुक्याचे सरपंच श्रद्धा बोराळे, सरिता पाथरे, मनीषा इंगळे तसेच संघटनेचे सर्व पदाधिकारी, ग्रामपंचायतींचे सरपंच, उपसरपंच आणि सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते. निवेदनात येत्या फेब्रुवारीत कार्यकाळ संपणाऱ्या ग्रामपंचायतींवर प्रशासक न नेमता सद्य बॉडीला निवडणूक होईपर्यंत मुदतवाढ देणे किंवा विद्यमान सरपंचांना प्रशासक म्हणून नेमण्याची मागणी करण्यात आली आहे.

# अधिकारी देणार गावोगावी भेट

## महसूल प्रशासनाचा ‘गाव भेट’ कार्यक्रम जाहीर

**महासागर प्रतिनिधी**
**मोर्शी,( दि.13 )** - राज्य शासनाच्या विविध क्षेत्रीय कार्यालयांमार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनांबाबत नागरिकांना माहिती देणे, त्यांची जागृकता वाढविणे आणि शासनावरील विश्वास दृढ करणे हाच या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे.



यासाठी महसूल राज्य मंत्री व पालकमंत्री, अमरावती जिल्हा, चंद्रशेखर बावनकुळे यांनी गाव भेट कार्यक्रम आयोजित करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी अमरावती यांना दिले आहेत. त्यानुसार जिल्हाधिकारी कार्यालयाकडून तहसील स्तरावर गाव भेटींचा कार्यक्रम आखण्यात आला आहे. सदर गाव भेट कार्यक्रमात महसूल मंत्री तसेच पालकमंत्र्यांमार्फत प्राप्त तक्रारींचा निपटारा, महसूल विषयक समस्या, गावातील विकासकामे आणि शासकीय कामकाजाविषयी नियोजन व समस्या यांचे निराकरण करण्यासाठी तालुक्यातील महसूल, पंचायत समिती व कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

मोर्शी तालुक्यातील या कार्यक्रमात सहभागी असणारे प्रमुख अधिकारी म्हणजे- तहसीलदार सागर ढवळे, गट विकास अधिकारी स्वप्निल मगदूम, तालुका कृषी अधिकारी प्रथमेश माने, निवासी नायब तहसिलदार विनोद वानखडे, उप कृषी अधिकारी विलास केचे, पंचायत समितीचे विस्तार अधिकारी जयंत गारले, नायब तहसिलदार चारुदत्त पाटील, उपकृषी अधिकारी मोहन फुले, पायल, पंचायत समितीचे विस्तार अधिकारी व्ही. एम. फंदे, निरीक्षण अधिकारी सागर बागडे, उप कृषी अधिकारी अरुण चरपे, विस्तार अधिकारी विक्रम शेंदरकर, उप कृषी अधिकारी कृष्णा बोरकुटे, विस्तार अधिकारी जयंत गोरले इत्यादी आहेत. दिनांक 9 फेब्रुवारी 2026 ते 6 मार्च 2026 या कालावधीत तालुक्यातील 67 ग्रामपंचायतींमध्ये हे अधिकारी भेट देतील, गावकऱ्यांच्या समस्या जाणून घेतील आणि त्यांचे निराकरण करतील.




# भारुडातून कुष्ठरोग व क्षयरोगावरील जनजागृती

**महासागर प्रतिनिधी**
**नांदगाव खंडेश्वर, ( दि.13 )**- मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानांतर्गत ग्रामपंचायत जनुना कार्यालयात आरोग्य विभागाच्या सहकार्याने महिला मेळावा आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमात स्पर्श कुष्ठरोग जनजागृती अभियान अंतर्गत उपस्थितांना कुष्ठरोगाची कारणे, लक्षणे, औषधोपचार व प्रतिबंधात्मक उपाय याबाबत मार्गदर्शन केले गेले. सहाय्यक संचालक डॉ. पूनम मोहोकार व तालुका आरोग्य अधिकारी डॉ. प्राजक्ता वानखडे यांनी सहभागी महिलांचे मार्गदर्शन केले.

अभिनव हायस्कूलच्या विद्यार्थ्यांनी निबंध स्पर्धेत व कलाकारांनी रांगोळी स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी केली, त्यांना प्रशस्तीपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. गावातील वृद्ध महिलांनी व आरोग्य सेवक राजेंद्र चकुले यांनी कुष्ठरोग व क्षयरोग विषयावर भारुड सादर केले. उपस्थित नागरिकांनी लक्षणे असलेल्या रुग्णांना सरकारी तपासणी व औषधोपचार घेण्याचे आश्वासन दिले. कार्यक्रमाचे आयोजन सरपंच जगदीश नरखेडकर व ग्रामसेवक जयश्री काकडे यांनी केले, तर उपस्थित महिलांना कुंड्यांचे वाटप करण्यात आले.

# प्रधानमंत्री आवास योजनेबाबत तक्रारींसाठी महापौरांचे आवाहन

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती, ( दि.13 )**-अमरावती महानगरपालिकेमार्फत राबविण्यात येत असलेल्या प्रधानमंत्री आवास योजने संदर्भात नागरिकांना कोणत्याही प्रकारच्या अडचणी किंवा तक्रारी असल्यास त्यांनी थेट संपर्क साधावा, असे आवाहन महापौर श्रीचंद तेजवाणी यांनी केले आहे.



प्रधानमंत्री आवास योजना आर्थिकदृष्ट्या दुर्बल व गरजू नागरिकांना परवडणारी घरे उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने केंद्र व राज्य शासनाच्या माध्यमातून राबविण्यात येत आहे. या योजनेची प्रभावी व पारदर्शक अंमलबजावणी व्हावी, यासाठी अमरावती महानगरपालिका सातत्याने प्रयत्नशील असून लाभार्थ्यांना सुलभ सेवा देण्यावर भर देत आहे. तथापि, अर्ज प्रक्रियेतील अडथळे, मंजुरीतील विलंब, बांधकामासंबंधी समस्या किंवा इतर कोणत्याही तक्रारी असल्यास नागरिकांनी विलंब न लावता थेट महापौरांशी संपर्क साधावा, असेही त्यांनी स्पष्ट केले. महापौर श्रीचंद तेजवाणी यांनी नागरिकांना आवाहन करत म्हटले, पात्र लाभार्थ्यांना शासनाच्या योजनेचा लाभ वेळेत व योग्य पद्धतीने मिळावा, यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत. कोणत्याही प्रकारची गैरसोय सहन केली जाणार नाही. नागरिकांनी पुढे येऊन तक्रारी नोंदवाव्यात. महानगरपालिका नागरिकांच्या तक्रारींचे तत्पर निवारण करून योजनेचा लाभ खऱ्या अर्थाने गरजूंपर्यंत पोहोचविण्यासाठी पूर्णपणे सज्ज आहे, असेही त्यांनी सांगितले.

# सरपंच पतीकडून अतिक्रमण केल्याचे स्पष्ट

## वाघडोह ग्रामपंचायतीमधील प्रकार | ग्रामस्थांचा सात दिवसांचा उपोषण संघर्ष यशस्वी

**महासागर प्रतिनिधी**
**परतवाडा,( दि.13 )** - अचलपूर तालुक्यातील वाघडोह ग्रामपंचायतमध्ये शासकीय जमीन बळकावण्याच्या गंभीर प्रकरणामुळे मोठा राजकीय भूकंप झाला आहे. या प्रकरणावर संतप्त ग्रामस्थांनी पंचायत समिती अचलपूर समोर सलग सात दिवस आमरण उपोषण करून विरोध नोंदवला.



उपोषणानंतर झालेल्या सखोल चौकशीत सरपंच पतींचे अतिक्रमण स्पष्टपणे निष्पन्न झाले असून, प्रशासनाने तत्काळ कारवाईसाठी विभागीय आयुक्तांकडे अहवाल पाठविला आहे.

ग्रामपंचायत अंतर्गत होणाऱ्या भ्रष्टाचाराविरोधात गावकऱ्यांनी एकत्र येऊन जयस संघटनेच्या माध्यमातून आंदोलन उभारले. उपोषणादरम्यान जयस संघटनेचे प्रदेश अध्यक्ष संदीप तोटे हजारो समर्थकांसह उपोषण मंडपाला भेट दिली. त्यांच्या उपस्थितीमुळे प्रशासनाची प्रक्रिया वेगाने पुढे सरकली.

गटविकास अधिकारी आणि पंचायत समिती अचलपूर यांनी केलेल्या चौकशीत सरपंच पतींचे अतिक्रमण स्पष्ट झाल्याचे अहवालात नमूद आहे. महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम कलम 39(1)(अ) अंतर्गत संबंधित सरपंच दोषी ठरल्याने अपात्रतेची कारवाई सुचवण्यात आली आहे. सात दिवस चाललेल्या शांततामय पण ठाम आमरण उपोषणामुळे गावकऱ्यांचा विजय निश्चित झाला आहे. वाघडोह ग्रामपंचायत क्षेत्रात आता पारदर्शकता आणि उत्तरदायित्वाची नवी चर्चा सुरू झाली आहे. सार्वजनिक मालमत्ता वाचवण्यासाठी गावकऱ्यांनी केलेला हा संघर्ष इतर गावांसाठी आदर्श ठरत आहे. सध्या सर्वांचे लक्ष विभागीय आयुक्तांच्या अंतिम निर्णयाकडे लागले असून, अपात्रतेची कारवाई झाल्यास वाघडोहच्या राजकारणात मोठा बदल होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

# काटकुंभ गावातील बीएसएनएल सेवा ठप्प

## नागरिकांमध्ये संताप

**महासागर प्रतिनिधी**
**चुरणी, ( दि.13 )**- चिखलदरा तालुक्यातील काटकुंभ परिसरातील नागरिक बीएसएनएलच्या दूरध्वनी सेवेतून झालेल्या अडचणींमुळे त्रस्त झाले आहेत. फोरजी सेवा सुरू झाल्यापासून नेटवर्क इतके खराब झाले आहे की फोनला उत्तर दिले तरी समोरच्याचा आवाज ऐकू येत नाही. नागरिक फक्त हॅलो म्हटल्यावरच आवाज गायब होतो, परिणामी संभाषण शक्य होत नाही.



या भागातील बीएसएनएल ग्राहकांचे म्हणणे आहे की यापूर्वी थ्रीजी सेवा असताना नेटवर्क तुलनेने सुरळीत चालत असे. मात्र फोरजी सुरू झाल्यापासूनच ही समस्या निर्माण झाली असून, आजही कोणतीही ठोस उपाययोजना करण्यात आलेली नाही. काटकुंभ परिसरातील नागरिक अजूनही बीएसएनएलच्या सेवेशी अवलंबून आहेत कारण खासगी दूरसंचार कंपन्यांचे नेटवर्क या दुर्गम भागात पोहोचलेले नाही.

नेटवर्कच्या सतत अडचणींमुळे विद्यार्थ्यांचे ऑनलाइन शिक्षण, शेतकऱ्यांचे व्यवहार, शासकीय कामकाज तसेच आपत्कालीन संपर्क यावर गंभीर परिणाम होत आहेत. रुग्णवाहिका, आरोग्य सेवा आणि प्रशासनाशी संपर्क साधताना नागरिकांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे. नागरिकांनी बीएसएनएलच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे या समस्येकडे तात्काळ लक्ष देऊन नेटवर्क दुरुस्ती, टॉवर तपासणी आणि सेवा सुरळीत करण्यासाठी ठोस पावले उचलण्याची जोरदार मागणी केली आहे. जर लवकरात लवकर ही समस्या सोडवली नाही, तर स्थानिक नागरिकांनी आंदोलनाचा इशाराही दिला आहे.ॅक्स॰

### वरिष्ठ अधिकाऱ्यांनी लक्ष द्यावे

मेळघाटमधील चिखलदरा तालुक्यातील काटकुंभ परिसरात बीएसएनएल सेवा अत्यंत खराब आहे. फोन आला की आवाज ऐकू येत नाही, नेटवर्क व्यवस्थित काम करत नाही. फक्त समोरचा व्यक्ती हॅलो-हॅलो म्हणत राहतो, नंतर आवाज गायब होतो. नागरिकांनी वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे तात्काळ लक्ष देण्याची मागणी केली आहे.

RNINO-46975/1985 Mahasagar Amravati
Printed published and owned by Shrikrishna Tansukhdas Chandak, printed at Arunodaya Press, Cotton Market, Nagpur-440018 and published at Dainik Mahasagar Office, Hotel Tourist Beside Railway Station square, Amravati. Amravati head office, address: Dainik Mahasagar, Hotel Tourist beside Railway Station square, Amravati, phone no 9518934504 Group Editor-in-Chief and Managing Director - Shrikrishna Tansukhdas Chandak, Group Editor - Sandeep Ramrao Kale, Managing Editor - Pankaj Shrikrishna Chandak

आर.एन. आय. नोंदणी क्र. ४६९७५/१९८५ महासागर अमरावती
मालक, मुद्रक, प्रकाशक : श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर, ४४००१८, येथे छापून, दैनिक महासागर कार्यालय, हॉटेल टुरिस्टच्या बाजूला, रेल्वे स्टेशन चौक अमरावती, येथे प्रकाशित केले. मुख्य संपादक व मॅनेजिंग डायरेक्टर : श्रीकृष्ण तनसुखदास चांडक, समूह संपादक : संदीप रामराव काळे, प्रबंध संपादक : पंकज श्रीकृष्ण चांडक





## चित्रपट शोधाशोध



खालील चौकटीत रणधीर कपूर २५ चित्रपट दडलेले आहेत. रचना आडवी, उभी, तिरपी, वरुन खाली व खालुन वर केलेली आहे. तेव्हा २५ चित्रपट रेखांकित करा.

| | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| रा | ज | ह | म | रा | ही | त | व | रा | रि | क्शा | वा | ला |
| म | का | ल | आ | ज | औ | र | क | ल | चा | म | आ | प |
| पू | मे | त | बी | वा | मा | मा | भां | जा | चा | ज | ज | त |
| र | जा | म | वी | नी | त | जी | त | र | भ | दू | का | क |
| का | दू | त | ओ | दि | ल | दि | वा | ना | ति | र | म | च्या |
| ल | र | गे | बी | वा | त | प | भं | प | जा | जि | हा | चो |
| क्ष्म | जिं | फं | वी | नी | ह | म | व | क | त | दा | त्मा | र |
| ण | दा | ल | क | जी | नी | औ | र | जॉ | नी | बा | त | क |
| आ | खि | री | डा | कू | त | क | दि | का | र | द | का | बा |
| ध | र | म | क | र | म | बे | व | फा | पु | स | न | म |
| ख | प | हा | थ | की | स | फा | ई | म | ह | र | जा | ई |
| ली | भा | र | त | र | क | स्मे | वा | दे | प | र | म | वी |
| फा | रं | गी | ला | र | त | न | क | रा | म | भ | रो | से |

## फिल्मी शब्दकोडे



### आडवे संकेत

१) इ.स. २००२ मध्ये तयार झालेल्या या चित्रपटात अजय देवगन, उर्मीला मातोंडकर आणि अक्षय खन्ना होते!
२) चिरंजीवी आणि मिनाक्षी शेषाद्री चा एक चित्रपट
५) इ.स. १९७५ मध्ये ऋषीकेश मुखर्जी दिग्दर्शीत या चित्रपटात अमीताभ बच्चन आणि जयाभादूरी होते
७) 'शोले' फिल्मचा खलनायक
९) इ.स. १९९० मध्ये कवल शर्मा दिग्दर्शीत या चित्रपटात 'कुणाल गोस्वामी' आणि शिल्पा शिरोडकर होते
१४)इ.स. १९९१ मध्ये यश चोपडा दिग्दर्शीत या चित्रपटात अनील कपूल आणि श्रीदेवी होते
१५)इ.स. १९७७ मध्ये ऋषीकेश मुखर्जी दिग्दर्शीत या चित्रपटात शत्रुघ्न सिन्हा आणि अपर्ना सेन होते
१७) रोटी कपडा और xxx (फिल्म)
१९) xxx कली एक ख्वाबमे आई... (फिल्म)
२०) प्यार कोई खेल xx (फिल्म)
२२) प्रभू देवा और नगमाचा एक फ्लॉप चित्रपट
२४) 'गदर' फिल्म मध्ये अमिशा पटेल चे नाव
२६)१९८४ मध्ये 'दसारी नारायणराव' दिग्दर्शीत या चित्रपटात कमल हसन आणि पुनम ढिल्लो होते
२८)१९९२ मध्ये आनंद दिग्दर्शीत फिल्म मध्ये गोविदा आणि दिव्या भारती होते
२९) १९९१ मध्ये महेश भट्ट दिग्दर्शीत या चित्रपटात संजय दत्त आणि पुजा भट होते
३०)आफताब आणि उर्मीलाचा एक चित्रपट

### उभे संकेत

१) इ.स. १९९७ मध्ये यश चोपडा दिग्दर्शीत या चित्रपटात शाहरुख, करिश्मा कपूर आणि अक्षयकुमार होते
३) इ.स. २००३ मध्ये तयार या चित्रपटात अजय देवगन, अभिषेक बच्चन आणि बिपाशा बासु होते
४) अविनाश वाधवन आणि आयशा जुल्का चा एक चित्रपट
६) 'संजय दत्त' ची पहिली फिल्म
८) 'कच्चे धागे' चित्रपटात अजय देवगनची नायीका
१०) इ.स. १९९१ मध्ये विमल कुमार दिग्दर्शीत या चित्रपटात गोविंदा आणि जुही चावला होते
११)१९८९ मध्ये के विश्वनाथ दिग्दर्शीत या चित्रपटात अनील कपूर आणि विजया शांती होते
१२)इ.स. १९८५ मध्ये अनिल गांगुली दिग्दर्शीत या चित्रपटात अनीलकपूर आणि अमृता सिंह होते
१३) इ.स. १९८३ मध्ये बापैया दिग्दर्शीत या चित्रपटात जितेंद्र आणि श्रीदेवी होते
१६) १९९५ मध्ये 'जयप्रकाश' दिग्दर्शीत या चित्रपटात ऋषी कपूर, तब्बू आणि रविना टंडन होते
१८) xxx आपके है कौन (एक फिल्म)
२१) ऋषी कपूर, झेबा बस्तीयार आणि अश्वीनी भावेचा एक चित्रपट
२२)२००२ मध्ये महेश मांजरेकर दिग्दर्शीत या चित्रपटात संजय दत्त आणि शिल्पा शेट्टी होते
२३) जॅकी श्रॉफ, फरहा आणिअनील कपूर कीमी काटकरचा चित्रपट
२५) देव आनंद आणि वहीदा रहेमानचा एक चित्रपट
२७)देवानंदचा एक चिञपट

| | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| फू | ट | पा | थ | | आ | नं | द | मि | लिं | द | | दि |
| ल | | | | क | | दी | | लीं | | | कू | ली |
| औ | र | प्या | र | हो | ग | या | | द | म | न | | प |
| र | | | | ना | | के | | सो | न | म | | ता |
| कां | टे | | गू | | | पा | | म | | क | | हि |
| टे | | | ना | | अ | र | मा | न | | ह | ला | ल |
| | प | ना | ह | | मि | | या | | मे | ला | | |
| | | गा | | उ | षा | | | | ज | ल | वा | |
| | अ | र्जू | न | | प | रे | श | | र | | | |
| ड | | न | | | टे | | रा | | सा | थी | या | |
| र | वी | | का | जो | ल | | र | | ब | | | न |
| | | त्या | | | | जी | त | | | प्या | | क |
| ब | र | सा | त | | ना | ना | | अं | त | रा | मा | ळी |

## जोड्या लावा



खालील ट्विंकल खन्नाच्या चित्रपटांची जोडी बाजुला दिलेल्या अभिनेत्यांसोबत लावा.

| अ | ब |
|---|---|
| १) बरसात | १) सलमान खान |
| २) जान | २) शाहरुख खान |
| ३) दिल तेरा दिवाना | ३) अमिर खान |
| ४) जब प्यार किसीसे होताहै | ४) सैफ अली खान |
| ५) जुल्मी | ५) मेहमान कलाकार |
| ६) बादशाह | ६) बॉबी देओल |
| ७) जोरु का गुलाम | ७) अभिषेक कपूर |
| ८) मेला | ८) अक्षय कुमार |
| ९) उफ येट मोहब्बत | ९) अजय देवगन |
| १०) चल मेरे भाई | १०) गोविंदा |

## चेहरा ओळखा?



वरिल चेहरा हा एका अभिनेत्रीचा आहे मात्र आमच्या फोटोग्राफरने त्याचा फोटो विचित्रपणे घेतलेले आहे ती अभिनेत्री ओळखा?

उत्तर :

## डोळे ओळखा?



हे डोळे कोणत्या चित्रपट अभिनेत्याचे आहेत ते ओळखा व खाली दिलेल्या डब्यात ते लिहा?

उत्तर :

## चित्रपट अभिनेत्यांचे पत्ते व जन्मदिवस

**पंकज धीर**
जन्मः ९ नोव्हेंबर
१०३/१०४, नूरवुड, लोखंडवाला, कॉम्लेक्स, अंधेरी (प.),
**मुंबई- ५८**

**पंकज कपूर**
जन्मः २९ मे
६१/६२, स्काई हेवन, यारी रोड, वर्सोवा, अंधेरी (पं) **मुंबई-६१**

**परेश राव**
जन्मः ३० मे
११, सी ब्रीज, १३ रोड, जे.वी.पी.डी. स्कीम, जुहू,
**मुंबई- ४९**

## फिल्म सफरनामा

### रीना रॉय



| क्रं. फिल्म | निर्माता | निर्देशक | संगीतकार | हीरो | सन् |
|---|---|---|---|---|---|
| १. जरुरत | आय.एम.कुन्नू | बी.आर. इशारा | बृज भूजण | विजय अरोडा | १९७२ |
| २. जैसे को तैसा | एम.बालू | मृगन कुमारन | आर.डी.बर्मन | जीतेन्द्र | १९७३ |
| ३. नई दुनिया नये लोग | नितिन फिल्म | बी.आर.इशारा | सपन जगमोहन | सत्येन | १९७३ |
| ४. गूंज | संगम मिल्म | एस.यू.सैयद | आ.डी. बर्मन | राकेश रोशन | १९७४ |
| ५. मदहोश | ताहिर हुसैन | देश गौतम | आर.डी. बर्मन | महेन्द्र संधू | १९७४ |
| ६. अपने दुश्मन | जीतेन्द्र इंटरप्राइजेस | कैलाश भंडारी | कल्याणजी–आनंदजी | धर्मेन्द्र | १९७५ |
| ७. रानी और लालपरी | रानी नगाइच | रवि नगाइच | बसंत देसाई | जीतेंद्र | १९७५ |
| ८. उमर कैद | सी.के.सोबती | सिकंदर खन्ना | सोनिक ओमी | सुनील दत्त | १९७५ |
| ९. जख्मी | ताहिर हुसैन | राजा ठाकुर | बप्पी लहरी | सुनील दत्त | १९७५ |
| १०. बारुद | जीतू ठाकर | प्रमोद चक्रवर्ती | एस.डी.बर्मन | ऋषि कपूर | १९७६ |
| ११. कालीचरण | एन.एन.सिप्पी | सुभाष घई | कल्याणजी–आनंदजी | शत्रुघ्न सिंन्हा | १९७६ |
| १२. संग्राम | रतन मोहन | हरमेश मल्होत्रा | बप्पी लहरी | शत्रुघ्न सिंहा | १९७६ |
| १३. नागिन | राजकुमार कोहली | राजकुमार कोहली | लक्ष्मीकांत–प्यारेलाल | जीतेन्द्र | १९७६ |
| १४. उधार का सिंदूर | एल.वी.प्रसाद | चंदन वोहरा | राजेश रोशन | जीतेन्द्र | १९७६ |
| १५. अपनापन | जे.ओम.प्रकाश | जे.ओम.प्रकाश | लक्ष्मीकांत–प्यारेलाल | जीतेन्द्र | १९७७ |
| १६. डाकू और महात्मा | राधा मोहन आर्ट | रविकांत नगाइच | रवीन्द्र जैन | कबीर बेदी | १९७७ |
| १७. गुमराह | के.पी.सेठी | प्रेम माणिक | उषा खन्ना | सुभाष घई | १९७७ |
| १८. ज्ञानीजी | पी.एन.फिल्म | चमन निल्ले | सरदार मलिक | सुनील दत्त | १९७७ |
| १९. जादू टोना | एच.वी.नगाइच | रविकांत नगाइच | हेमंत भोसले | फिरोज खान | १९७७ |
| २०. जागृति | विमल भाटिया | राजेन्द्र भाटिया | लक्ष्मीकांत–प्यारेलाल | विनोद मेहरा | १९७७ |
| २१. जय विजय | एल.वी.प्रसाद | एल.वी.प्रसाद | राजेश रोशन | जीतेंद्र | १९७७ |
| २२. पापी | ओ.पी.रल्हन | ओ.पी. रल्हन | बप्पी लहरी | संजीव कुमार | १९७७ |
| २३. जमानत | वी.के. सांबती | ए.सलाम | सोनिक ओमी | जीतेंद्र | १९७७ |
| २४. आखिरी डाकू | शांति सागर | प्रकाश मेहरा | कल्याणजी–आनंदजी | वनोद खन्ना | १९७८ |
| २५. बदलते रिश्ते | सुदेश कुमार | आर. झालानी | लक्ष्मीकांत–प्यारेलाल | विनोद खन्ना | १९७८ |
| २६. भूख | एस.आय.शिवदासानी | दिनेश–रमनेश | सोनिक ओमी | शत्रुघ्न सिन्हा | १९७८ |
| २७. चोर हो तो ऐसा | एन.पी.सिंह | रवि टंडन | आर.डी.बर्मन | शत्रुघ्न सिन्हा | १९७८ |
| २८. डाकू और जवान | जगदीश शर्मा | सुनील दत्त | लक्ष्मीकांत–प्यारेलाल | सुनील दत्त | १९७८ |
| २९. विश्वनाथ | पवन कुमार | सुभाष घई | राजेश रोशन | शत्रुघ्न सिन्हा | १९७८ |
| ३०. कर्मयोगी | अनिल सुरी | राम माहेश्वरी | कल्याणजी–आनंदजी | जीतेन्द्र | १९७८ |

(शेष भाग कल के अंक में)

## चित्रपट अंताक्षरी

**संकेतः**
**१ ते २ -** फिल्म शहीदचे संगीतकार
**२ ते ३-** मांग के साथ तुम्हारा मैने मांग लिया संसार या गीताचा चित्रपट
**३ ते ४-** चौदहवी का चाँद या चित्रपटाचे संगीतकार
**४ ते ५-** विश्वाला जिंकणारा या अर्थाचा हिरो
**५ ते ६-** जिने की XXXX और एक वादा है.......
**६ ते ७-** परदेसची नायिका
**७ ते ८-** XX भादुरी
**८ ते ९-** ओह रे XXXX मे नदी मिले सागर से सागर मिले कौन से जल मे कोई जाने

### मागील अंताक्षरीचे उत्तर

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| छु | क | र | मे | रे | म | न | को |
| | | | | | | | कि |
| फू | ल | तु | म्हा | रे | श | | या |
| धा | | | | | म | | तु |
| गं | | र्मा | | | को | | ने |
| नी | | श | चा | री | डी | | क्या |
| ज | | | | | | | इ |
| र | ग | सा | द | न | मा | रा | शा |

## लाडीलप्पा

खाली काही चित्रपटांची नावे उलट सुलट लिहिलेली आहेत. त्यांना क्रमवार लिहून बाजूच्या चौकटीत भरा.

१) औ टे फु काँ ल र
२) है ना र क प्या हो
३) क र ही प्या न झु ता
४) ते ह पा क है पा
५) म रा मे र ना क जो
६) ज य जा ना

आता जी अक्षरे ○ या बॉक्समध्ये लिहिल्या गेली आहेत त्यांची योग्य जुळवा जुळव केल्यास एका अभिनेत्याचे नांव तयार होईल तेव्हा खालील डब्यात ते नाव लिहा.

अभिनेत्याचे नांव

**कालचे उत्तरः** १) करन अर्जून २) हमारा खानदान ३) जोरु का गुलाम ४) हद कर दी आपने ५) शालीमार ६) खतरो के खिलाडी
**अभिनेत्याचे नांवः** शाहरुख खान

# उपराजधानीचे ५२२ कोटी सरकारकडे रखडले!

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १३ :
शहरात केंद्र व राज्य सरकारचे अनेक प्रकल्प सुरू आहेत. परंतु महापालिकेचे पायाभूत सुविधांचे ४५० कोटी तर सप्टेंबर २३ मधील अंबाझरी तलाव ओव्हरफ्लोमुळे झालेल्या नुकसानीच्या भरपाईचे ७२ कोटी रुपये अद्यापही राज्य सरकारकडे प्रलंबित आहेत.

केंद्रीयमंत्री नितीन गडकरी, मुख्यमंत्री फडणवीस, पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे असे दिग्गज नेते असतानाही महापालिकेचा निधी अडकला आहे.

महापालिकेची आर्थिक स्थिती जेमतेम आहे, त्यातच महापालिका निवडणुकीमुळे मालमत्ता कराच्या वसुलीलाही फटका बसला आहे. २०२५ मध्ये १६ जानेवारीपर्यंत मालमत्ता करापोटी ७३ लाख ३२ हजार ७७८ रुपयांची वसुली झाली.
यावर्षी १६ जानेवारीपर्यंत १० लाख ३२ हजार ६८४ रुपयांपर्यंतच वसुली होऊ शकली. १५ दिवसात फक्त १४ टक्के वसुली झाल्याने आता मार्चपर्यंत २०२५-२६ या वर्षाचे ४०० कोटींचे लक्ष्य गाठण्याचे मोठे आव्हान महापालिकेपुढे आहे.

फेब्रुवारी व मार्च असे या महिन्यांत दोनशे कोटींवर वसुलीचे अशक्यप्राय असे आव्हान आहे. त्यातच राज्य सरकारने पायाभूत सुविधांसाठी मंजूर केलेले ४५० कोटी रुपये अद्याप महापालिकेला दिले नाहीत. त्यामुळे महापालिकेकडून करण्यात येणाऱ्या पायाभूत सुविधांवर परिणाम झाला आहे. अनेक ठिकाणी सांडपाणी वाहून नेणाऱ्या नवीन नाल्यांची कामे थांबली. परिणामी नागरिकांना तुंबलेल्या सांडपाण्यातील घाण व दुर्गंधी सहन करावी लागत आहे.

सप्टेंबर २०२३ मध्ये आलेल्या पुराने रस्ते, नदीच्या संरक्षक भितीचेही मोठे नुकसान झाले होते. अतिवृष्टीमुळे क्षतिग्रस्त ५६ नदी, नाल्यांच्या सुरक्षा भिंतीचे बांधकाम आणि क्षतिग्रस्त ४१ रस्त्यांच्या कामांसाठी महापालिकेने २०४ कोटींच्या निधीचा प्रस्ताव राज्य सरकारकडे पाठवला होता.

कमी दरात निविदा आल्याने १५८ कोटींवर हा खर्च आला. राज्य सरकारने यात १४.५० कोटी व ७२ कोटी, असे ८६.५० कोटी रुपये दिले. परंतु अद्याप ७२ कोटी रुपये प्रलंबित आहेत. यातील जवळपास सर्व कामे झाली आहेत. त्यामुळे कंत्राटदारांचेही बिले साबांविकडे पडून आहे.

नागनदीला पुनरुज्जीवन हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प १,९२६ कोटी रुपयांचा आहे. यासाठी ६० टक्के खर्च केंद्र सरकार, २५ टक्के राज्य सरकार आणि १५ टक्के खर्च महापालिका करणार आहे. राज्य सरकार प्रकल्पासाठी ५०७.३६ कोटी रुपये देणार आहे. केंद्र सरकार १,११५.२२ कोटी देणार असून महापालिकेला ३०४.४१ कोटी द्यावे लागणार आहे.

परंतु, नागनदी प्रकल्पावर खर्च झाल्यानंतर आलेल्या देयकाची रक्कम महापालिकेला राज्य सरकारकडे जमा करावी लागणार आहे. एकूणच नागपूरच्या विकासकामांचा निधी रखडल्याने अडचण झाली आहे.

## ॲंटिलियासमोर स्फोटके, १०० कोटी खंडणी ते लीलावती प्रकरण

# अनिल देशमुखांनी मांडली परमबीर सिंगांची कुंडली

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर / मुंबई, दि. १३ :
राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते आणि माजी गृहमंत्री अनिल देशमुख यांनी मुंबईत घेतलेल्या पत्रकार परिषदेत माजी पोलिस आयुक्त परमबीर सिंग यांच्यावर जोरदार टीका केली.

मी गृहमंत्री असताना माझ्यावर खोटे आरोप करून बदनाम करण्याचे षडयंत्र ज्याने रचले, त्याच व्यक्तीचे भ्रष्ट कारनामे आता एकामागून एक समोर येत आहेत, असे देशमुख म्हणाले. मुंबईतील लीलावती रुग्णालय येथे त्यांना ज्या प्रकारे पदावरून दूर करण्यात आले, त्यावरून त्यांचे वर्तन आणि चारित्र्य जनतेसमोर उघड झाले असल्याचा दावा त्यांनी केला.

देशमुखांनी सांगितले की, लीलावती रुग्णालयातील ट्रस्टी आणि डॉक्टरांनी परमबीर सिंग यांच्याविरोधात गंभीर स्वरूपाचे आरोप केले आहेत. बढतीच्या आमिषाने अनेक डॉक्टरांकडून प्रत्येकी 25 लाख रुपये उकळण्याचा प्रकार सुरू होता. या कथित गैरप्रकारांमुळे आणि गैरवर्तनामुळे रुग्णालय प्रशासनाने त्यांना पदावरून काढून टाकल्याचे देशमुखांनी नमूद केले.

माजी गृहमंत्र्यांनी पुढे ॲंटिलिया प्रकरणाचा उल्लेख करत सांगितले की, उद्योगपती मुकेश अंबानी यांच्या निवासस्थाना बाहेर स्फोटकासारखी वस्तू आढळल्यानंतर तपासाच्या दिशेबाबत शंका निर्माण झाल्या होत्या. त्या वेळी परमबीर सिंग सरकारची दिशाभूल करत



असल्याचा संशय आल्याने तपास त्यांच्या हातातून काढून दहशतवाद विरोधी पथक यांच्याकडे सोपवण्यात आला, असे देशमुखांनी स्पष्ट केले.

एटीएसच्या तपासातून काही गंभीर संकेत समोर आले होते, असा दावा करत देशमुख म्हणाले की, या प्रकरणात सिंग यांची भूमिका संशयास्पद वाटल्याने त्यांची कमी महत्त्वाच्या पदावर बदली करण्यात आली. पुढे शासकीय सेवेतून त्यांना दूर करण्याची कारवाईही करण्यात आली, असे त्यांनी सांगितले. या सर्व निर्णयांचा संदर्भ त्या वेळच्या तपासातील निष्कर्षांशी जोडला गेला होता, असे देशमुखांचे म्हणणे आहे.

देशमुखांनी 100 कोटी रुपयांच्या कथित आरोपांचा उल्लेख करत सांगितले की, ही कारवाई टाळण्यासाठी माझ्यावर खोटे आरोप लावण्यात आले. आरोप होताच स्वतः चौकशीची मागणी केल्याचे त्यांनी सांगितले. त्यानंतर उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती न्यायमूर्ती चांदीवाल यांच्या अध्यक्षतेखाली चौकशी समिती नेमण्यात आली होती. या समितीसमोर हजर राहण्याचे समन्स बजावूनही सिंग वारंवार गैरहजर राहिल्याचा आरोप त्यांनी केला.

**अटकेच्या भीतीने सिंग काही काळ फरार**

देशमुखांच्या म्हणण्यानुसार, सहा वेळा समन्स बजावूनही उपस्थित न राहिल्याने अटकेच्या भीतीने सिंग काही काळ फरार होते. शेवटी वकिलामार्फत सादर केलेल्या प्रतिज्ञापत्रात अनिल देशमुखांविरुद्ध कोणताही ठोस पुरावा नाही, असे मान्य केल्याचा दावा त्यांनी केला. या घटनाक्रमामुळे 100 कोटींच्या आरोपांची विश्वासार्हता उरली नसल्याचे देशमुख म्हणाले.

या पार्श्वभूमीवर लीलावती रुग्णालयातील घडामोडींचा उल्लेख करत देशमुखांनी संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी व्हावी, अशी मागणी केली. भ्रष्ट आणि गुन्हेगारी प्रवृत्तीच्या अधिकाऱ्याचे रुग्णालयातील कथित कारनामे गंभीर आहेत. याबाबत सत्य बाहेर यावे, असे ते म्हणाले.

# अडगावात भीषण आग तिघांचा होरपळून मृत्यू



■ महासागर प्रतिनिधी
अडगाव / अकोला, दि. १३ :
तेल्हारा तालुक्यातील अडगांव (बु.) येथे गुरूवारी सायंकाळी लागलेल्या आगीत तिघांचा होरपळून मृत्यू झाला.

आठवडी बाजारा लगत शेख इब्राहिम यांचे राहते घर असून सायंकाळच्या सुमारास त्यांच्या घराला अचानक आग लागली. आगीत भाडेकरू गंभीररित्या जळाले. आग विझवण्यासाठी गावातील नागरिकांनी अथक परिश्रम घेतले.

ग्राम पंचायतने ताबडतोब पाणी पुरवठा सुरु केला तसेच अग्निशामक दलाच्या तेल्हारा आणि अकोट येथून दोन गाड्या घटनास्थळी पोहोचल्या. परंतु घरात डीझेलच्या अनेक कॅन साठवून ठेवण्यात आल्याने आगीने रौद्र रूप धारण केले.

घरात अडकलेले स्वरा प्रभुदास सोळंके (वय ६), रत्ना उकर्डा चव्हाण (५५) आणि अनिल उकर्डा चव्हाण (२७) हे भाडेकरु गंभीररित्या जळाले. त्यात स्वरा आणि अनिल यांचा जळाल्याने मृत्यू झाला तर रत्ना चव्हाण यांना स्थानिक प्राथमिक आरोग्य केंद्रात नेले. मात्र, तेथे कोणीही हजर नसल्याने त्यांना अकोट येथे नेण्यात आले. मात्र, वाटेतच त्यांचा मृत्यू झाला.

एसडीपीओ निखिल पाटील, तहसीलदार महेश रामगुंडे, ठाणेदार गजानन राठोड, उपनिरीक्षक गिलबिले, तलाठी देशमुख, पोलीस पाटील हागे यांनी घटनास्थळी भेट दिली. पोलीस फॉरेन्सिक लॅबची व्हॅन सुद्धा घटनास्थळी दाखल झाली.

मिळालेल्या माहितीनुसार, रत्ना या त्यांचा मुलगा अनिल सोबत शेख इब्राहिम यांच्या घरी गेल्या काही वर्षापासून भाड्याने राहायच्या. स्वरा ही रत्नी यांची नात आणि अनिलची भाची होती. काही दिवसांपूर्वीच तिचा वाढदिवस साजरा झाला होता. या घटनेने सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे.



# प्रकल्पाबाहेरील वाघांच्या व्यवस्थापनासाठी ५ कोटी मंजूर

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १३ :
महाराष्ट्रातील अधिकृत व्याघ्र प्रकल्पांच्या सीमांबाहेर वास्तव्य करणाऱ्या वाघांच्या व्यवस्थापनासाठी राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरणाने पहिल्यांदाच विशेष निधी मंजूर केला आहे. मंजुरी आदेशानुसार, एनटीसीएने राज्यातील ६ वन विभागांसाठी व्याघ्र प्रकल्पाबाहेरील वाघांचे व्यवस्थापन मानव-वाघ संघर्ष हाताळण्यासाठी धोरणे या प्रकल्पांतर्गत २०२५-२६ या वर्षासाठी ५.४० कोटी रुपये मंजूर केले आहेत.

नॅशनल कॅम्पा फ्रेमवर्क अंतर्गत मंजूर झालेला हा निधी चंद्रपूर, ब्रह्मपुरी, मध्य चांदा, नागपूर, पांढरकवडा आणि वडसा या विभागांना विभागून दिला जाईल. यात प्रत्येक विभागासाठी ९० लाख रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. या विभागांच्या वार्षिक कृती आराखड्यात शीघ्र प्रतिसाद पथके बचाव कार्य आणि बेशुद्धीकरणासाठी लागणारी उपकरणे, कॅमेरा ट्रॅप्स, पूर्वसूचना देणारी यंत्रणा, ड्रोन, जीपीएस युनिट्स, वायरलेस नेटवर्क, प्रतिसाद पथकांसाठी वाहने, जीआयएस सपोर्ट आणि कर्मचारी व स्थानिक स्वयंसेवकांच्या प्रशिक्षणाचा समावेश असल्याचे सांगण्यात आले.

एनटीसीएने अट घातली आहे की, मंजूर रकमेचा वापर कॅम्पा नियम २०१८ आणि सामान्य वित्तीय नियम २०१७ नुसार केवळ मंजूर कामांसाठीच केला जावा. राज्य सरकारला थेट लाभ हस्तांतरण नियमांचे पालन करण्याचे, योजनांची पुनरावृत्ती टाळण्याचे आणि मालमत्ता व साठा नोंदवही ठेवण्याचे निर्देश दिले आहेत. या प्रकल्पाच्या अंमलबजावणीवर एनटीसीएकडून सहामाही आणि वार्षिक अहवालांद्वारे देखरेख ठेवली जाईल, असेही कळवण्यात आले आहे.

अधिसूचित व्याघ्र प्रकल्पांच्या बाहेर होणारा मानव-वाघ संघर्ष कमी करण्याच्या उद्देशाने हा खर्च कॅम्पा निधीतून केला जाईल. महाराष्ट्रात सध्या वाघांची संख्या २०१८ पासून वाढली आहे. राज्यात अंदाजे ४४४ वाघ आहेत. त्याआधी २०१८ मध्ये महाराष्ट्रात ३१२ वाघ होते, असा अहवाल आहे.

व्याघ्र मित्र कार्यक्रम, माझा वाघ माझी शाळा या उपक्रमाद्वारे शाळांमध्ये जनजागृती, तसेच स्थानिक समुदाय आणि प्रसारमाध्यमांसोबतच्या बैठका यांसारख्या लोकसंपर्क मोहिमांचाही यात समावेश आहे. राज्यात सुमारे १८० वाघ हे व्याघ्र प्रकल्पांच्या अधिसूचित क्षेत्राबाहेर जंगलात वास्तव्य करत आहेत.

पान १ वरून

## खरीखरी....

बांगला देशात सध्या तिथे अल्पसंख्याक असलेल्या हिंदू समाजावर जीवघेणे हल्ले होत आहेत. त्यावर नव्या सरकारला गंभीरपणे विचार करून ते हल्ले थांबवावे लागतील. आज बांगलादेशात अनेक बाबतीत हाहाकार सुरू आहे त्यामुळे नव्या सरकारला कितीतरी गोष्टींमध्ये व्यावहारिक निर्णय घेणे गरजेचे ठरेल. भारतातील अवैध बांगला देशीयांची संख्या बरीच मोठी आहे. त्यांना भारतात खोट्या नावाने राहावे लागते, खरेतर त्यांची हकालपट्टीही होऊ शकते. तेव्हा बांगलादेशाला आपल्या नागरिकांबाबत सकारात्मक विचार करावाच लागेल. सध्या तरुणांच्या डोक्यात धर्म विद्वेषाचा द्वेष भरणे चालू आहे मात्र आता नव्या सरकारला अशा प्रवृत्ती ठेचून काढाव्या लागतील, त्या चालू देणे त्यांना परवडणारे नाही. गेल्या वर्षी उलथापालथ झाल्याने बरेच प्रश्न निर्माण झालेले आहेत. सर्वात महत्त्वाचा प्रश्न आहे तो बांगला देशातील हिंदू जनतेचा त्यासाठी तेथील सरकारला कडक धोरण स्वीकारावे लागेल. आता पुढील पाच वर्षे तरी शेख हसीना सत्तेवर येतील असे दिसत नाही. त्यांच्या पक्षावर अंतरिम पक्षाने बंदी आणली होती. त्यामुळे शेख हसीना यांच्या पक्षातील बडेबडे नेते सैरभैर झालेले दिसतात. आता वातावरण निर्मिती करून विद्वेषाला बंद करावे लागेल. हे काम वाटते तितके प्रत्यक्षात सोपे नाही. त्यासाठी कठोर नियम करून देशात परस्पर प्रेमाचे वातावरण निर्माण करावे लागेल. नव्या सरकार समोर अनेक गंभीर प्रश्न उभे राहणार आहेत त्यांचा निकाल लावणे सुद्धा कर्मकठीण गोष्ट आहे. देशातील जनतेचे दैनंदिन प्रश्न सोडवणे ही बांगला देशातील सरकारची प्राथमिक जबाबदारी असेल. तरीही आपण बांगला देशात स्वस्थ परंपरा निर्माण होईल, अशी आशा करूया!

mahasagarngp@gmail.com
Mob. No. 9922970023

पान १ वरून...

**दोन महिन्यात बदल्या...**

परिस्थितीत ही मर्यादा वाढवता येते, मात्र ६ वर्षांपेक्षा जास्त काळ एकाच जागी राहणे नियमबाह्य ठरते. नियमानुसार, बदल्यांचे आदेश दरवर्षी एप्रिल आणि मे महिन्यात काढले जातात. प्रशासनाच्या या आक्रमक पवित्र्यामुळे मंत्रालयातील लॉबिंगला चाप बसणार आहे. दोन महिने आधीच खबरदारी घेऊन पर्यायी व्यवस्था निर्माण करीत आहे. बदली झाल्यानंतर ती रद्द करण्यासाठी किंवा मुदतवाढ मिळवण्यासाठी केली जाणारी रडारड करता येणार नाही, असा संदेश यातून देण्यात आला आहे. नियमांची काटेकोर अंमलबजावणी करून प्रशासकीय शिस्त लावण्याचा प्रशासनाचा मानस दिसून येतो. एकूणच यामुळे प्रशासकीय शिस्त लागणार असल्याचे मंत्रालयातील सूत्र सांगत आहेत.

**बजेटपूर्वी मुख्यमंत्र्यांकडून...**

पालकमंत्र्यांशी संवाद साधला. त्यावेळी ते अधिकाऱ्यांना म्हणाले की, केवळ कागदोपत्री आकडेवारी नको, तर जमिनीवर झालेली कामे दाखवा. मराठवाडा वॉटर ग्रिडचे काम पाहणाऱ्या अधिकाऱ्यांना वेळेची मर्यादा पाळावीच लागेल. केवळ निधी वाटप करून चालणार नाही.

**पंतप्रधान कार्यालयाच्या...**

'सेवा तीर्थ' संकुलाचे उद्घाटन केले. आता त्यात पंतप्रधान कार्यालय (पीएमओ), राष्ट्रीय सुरक्षा परिषद सचिवालय (एनएससीएस) आणि कॅबिनेट सचिवालय असेल. आजपासून पंतप्रधान कार्यालय रायसीना हिलवरील साउथ ब्लॉकमधून सेवा तीर्थ येथे हलवले जाईल. उद्घाटनादरम्यान, पंतप्रधानांनी नवीन संकुलात 'सेवा तीर्थ' ला समर्पित फलकाचे अनावरण केले. संकुलाच्या भिंतीवर देवनागरी लिपीत 'सेवा तीर्थ' असा शिलालेख कोरलेला आहे. पंतप्रधानांचे कार्यालय १९४७ पासून साउथ ब्लॉकमध्ये होते. ही इमारत जवळजवळ ७८ वर्षांपासून देशातील सत्तेचे केंद्र मानी जात होती.

# नीलेश महाजन राज्यात पहिला

**एमपीएससीची गुणवत्ता यादी जाहीर**

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १३ :
सहायक प्राध्यापक, क्षयरोग व उरोरोगशास्त्र, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, वैद्यकीय शिक्षण व संशोधन सेवा, गट ब या संवर्गाच्या मुलाखती ११ व १२ फेब्रुवारी, २०२६ या कालावधीत घेण्यात आल्या होत्या.

विचाराधीन संवर्गाची तात्पुरती सर्वसाधारण गुणवत्ता यादी महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, नागपूर येथे दाखल (मूळ अर्ज ४२/२०२६) प्रकरणातील अंतिम न्यायनिर्णयाच्या अधीन राहून आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आली आहे.

प्रस्तुत संवर्गाची सर्वसाधारण गुणवत्ता यादी निव्वळ तात्पुरत्या स्वरूपाची असून, उमेदवारांनी अर्जामध्ये केलेल्या विविध दाव्यांच्या अनुषंगाने अंतिम निकालापूर्वी प्रमाणपत्र/कागदपत्रे पडताळणीअंती काही उमेदवारांच्या दाव्यांमध्ये/शिफारशीमध्ये बदल होऊ शकतो. परिणामी, नीलेश मनोहरराव महाजन यामध्ये पहिले आहेत. या गुणवत्ता यादीमध्ये उमेदवारांचे गुणही जाहीर करण्यात आले आहेत.

# वंदे भारत एक्सप्रेसमध्ये ठेवला साप

## रेल्वेच्या आरपीएफ पथकाने केली आरोपीला अटक




■ महासागर प्रतिनिधी, अकोला, दि. १३ :
वंदे भारत एक्सप्रेसमध्ये साप ठेवणाऱ्या एका आरोपीला मध्य रेल्वेच्या आरपीएफ पथकाने अटक केली आहे. नाशिक जिल्ह्यातील रहिवासी असलेल्या ३७ वर्षीय आरोपीचे नाव जगन अर्जुन भाले आहे. मुंब्रा येथून त्याला अटक करण्यात आली.

वंदे भारत गाडी क्रमांक २२२२५ च्या कोच सी-१६ च्या शौचालयात एक साप आढळला. शौचालय तात्काळ बंद करण्यात आले आणि नियंत्रण कक्षाला कळवण्यात आले. सोलापूर स्थानकावर सापाला सुरक्षितपणे वाचवण्यात आले. सीसीटीव्ही फुटेजमध्ये एका अज्ञात व्यक्तीने शौचालयात साप ठेवल्याचे उघड झाले. रेल्वे कायदा, १९८९ च्या कलम १४५(ब), १४७ आणि १५३ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आणि प्रकरणाचा तपास सुरू झाला.

सीसीटीव्ही फुटेजच्या मदतीने आणि एका गुप्त माहीतगाराने दिलेल्या माहितीनुसार, आरपीएफ पथकाने कारवाई केली आणि मुंब्रा येथील आरोपी जगन अर्जुन भाले याला अटक करण्यात आली. चौकशीदरम्यान आरोपीने गुन्ह्याची कबुली दिली. सदर आरोपीला कल्याण येथील रेल्वे न्यायालयात हजर करण्यात आले, जिथे १४ दिवसांची दंडाधिकारी कोठडी (एमसीआर) मिळाली.